दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २२५ । गुरूवार २८ मे २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

**स्वत:च्या आत्म्याला जाणण्याचे साधन...**सहजयोगामध्ये हे सगळं अगदी शिकण्यासारखं आहे. पण जर तुम्ही मधोमध मंडळी, साधारण प्रवृत्तीचे असाल, साधारण, तर सहजच तुम्ही पार व्हाल. पार झाल्यावर मात्र तुम्हाला सहज योगात जमावं लागेल. पार पटकन व्हाल, त्याला काही हरकत नाही, आम्ही करून टाकू ते. ते कार्य घटीत होतं, पण त्याच्या नंतर जमावं लागत. म्हणजे काय? आम्हाला सत्यचं हव. दुसरं काही नको. असं म्हणत राहायचं सारखं. जे सत्य नसेल ते आम्ही घेणार नाही. सत्य जे दिसेल तेव्हढचं आम्ही घेऊ, असं म्हणत चालले कि बरोब्बर उतरत ते. आणि मग काय आनंद होतो ते अगदी बघण्या सारखं आहे. सहजयोग, हे काय भाषण नव्हे किंवा हे लेक्चरबाजी नव्हे. त्याच्यामध्ये काही इलेक्शनबाजी पण नाही. काहीही त्याच्यात नाही. हे तुमच्यातलं, तुमच्यात जे आहे, ते शोधण्याचं साधन आहे. तुमच्यातलं जे काही महत्वपूर्ण आहे, ज्याला आपण आत्मा म्हणतो, त्या आत्म्यामधे उतरण्याचं जे साधन आहे, ते सहजयोग आहे. ते तुम्ही स्वतः साठी, आपल्या भल्यासाठी मिळवायचं असतं. माझ काही तुम्ही भलं करणार नाही. तुम्ही आपल्या शक्तीला ओळखा. तुमच्यात जी शक्ती आहे, ती जागृत झाली पाहिजे. तुम्ही आपल्या शक्तीला प्राप्त झालं पाहिजे, एवढीच आमची इच्छा आहे. त्या शक्तीला तुम्ही प्राप्त झालं पाहिजे. २० जानेवारी १९७८ पुणे अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191



'सहजयोग'
भाग ६४

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्वाचे..



### हिवरगाव पठार येथे वीज पडून एकाचा मृत्यू

झरेकाठी : संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पठार गावअंतर्गत येणार्या दगडसोंडवाडी येथे बुधवार दिनांक २७ मे रोजी दुपारी सुमारे सव्वाचार वाजता वीज पडून एका ३५ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मच्छिंद्र झुंबर दुधवडे असे मृत तरुणाचे नाव आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार मयत मच्छिंद्र दुधवडे हा तरूण खंडेरायवाडी येथे शेतीकाम करत होता. बुधवारी दुपारी तो आपल्या दगडसोंडवाडी गावी आला होता. याच दरम्यान परिसरात अचानक वादळी वार्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली होती. त्याचवेळी जोरदार विजांचा कडकडाटही सुरू होता. त्यामुळे दुधवडे या तरूणाने दुचाकी गाळात गुतू नये म्हणून तो दुचाकी शेतातील रस्त्याने बाहेर काढत होता. मात्र त्याचवेळी वीज अंगावर कोसळून त्याचा जागीच मृत्यू झाला आहे.

या घटनेनंतर परिसरातील शेतकर्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. या दुर्दैवी घटनेमुळे दगडसोंडवाडीसह हिवरगाव पठार परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## साखर उद्योगाला दिलासा

# 'एमएसपी' वाढ, कर्ज पुनर्गठनाबाबत केंद्र सकारात्मक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** अहिल्यानगरसह राज्यातील ऊस उत्पादक शेतकरी, सहकारी साखर कारखाने आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची ठरणारी बैठक दिल्लीत पार पडली असून, साखरेच्या किमान विक्री दरवाढीपासून (एमएसपी) ते साखर कारखान्यांच्या कर्ज पुनर्गठनापर्यंतच्या मुद्द्यांवर केंद्र सरकार पुढील दहा दिवसांत निर्णय घेणार असल्याचे आश्वासन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील साखर उद्योगाशी संबंधित शिष्टमंडळाने दिल्ली येथे केंद्रीय



सहकारमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या बैठकीत राज्यातील सहकारी साखर कारखान्यांची आर्थिक अडचण, वाढलेला उत्पादन खर्च, निर्यात प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या एफआरपी देयकांचा मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला. बैठकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, मंत्री गिरीश महाजन, छगन भुजबळ, प्रल्हाद जोशी, शिवराजसिंह चव्हाण उपस्थित होते.

**■ बैठकीत साखरेच्या एमएसपीमध्ये वाढ, इथेनॉल निर्मितीसाठी अधिक कोटा, साखरेसाठी दुहेरी किंमत धोरण, कारखान्यांच्या कर्जाचे पुनर्गठन तसेच व्याजदरात सवलत या प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या. केंद्र सरकारने यावर सकारात्मक भूमिका घेतल्याचे सांगितले जात आहे.**

अहिल्यानगर जिल्ह्यात ऊस आणि कांदा ही प्रमुख नगदी पिके मानली जातात. जिल्ह्यातील अनेक सहकारी साखर कारखाने आर्थिक दबावाखाली काम करत असताना, कर्ज पुनर्गठनाचा निर्णय झाल्यास कारखान्यांना मोठा दिलासा मिळू शकतो. त्याचबरोबर साखरेचा एमएसपी वाढल्यास शेतकऱ्यांच्या ऊस बिलाच्या देयकांनाही गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. गेल्या काही महिन्यांपासून कांद्याच्या घसरलेल्या दरामुळे शेतकरी अडचणीत असताना, साखर उद्योगाला मिळणारा आधार ग्रामीण अर्थचक्राला काही प्रमाणात बळ देणारा ठरू शकतो. त्यामुळे केंद्र सरकारच्या पुढील निर्णयाकडे आता संपूर्ण राज्यातील ऊस उत्पादक आणि सहकारी क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# दोन भाच्यांसह मामाचा ट्रॅक्टर अपघातात मृत्यू

### खरंवडी येथील घटना सोनईत शोककळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील खरवंडी येथे झालेल्या भीषण ट्रॅक्टर अपघातात सोनईच्या दोन अल्पवयीन सख्ख्या भावांसह त्यांच्या मामाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे सोनई व खरवंडी परिसरात शोककळा पसरली आहे.



सोनई येथील दत्तनगर परिसरातील प्रगतशील शेतकरी व दुध व्यवसायिक गणेश दरंदले यांची मुले अभिषेक गणेश दरंदले (वय १६) व विजय गणेश दरंदले (वय १४) यांना शाळेला सुट्टी लागल्याने ते मंगळवारी सकाळी खरवंडी येथील त्यांचे मामा रामेश्वर बाळासाहेब मराठे यांच्याकडे गेले होते. सायंकाळच्या सुमारास खरवंडी परिसरातील खळवाडी भागात ट्रॅक्टरचा अपघात होऊन ट्रॅक्टर पलटी झाला.

या घटनेची माहिती परिसरात पसरताच ग्रामस्थांनी हळहळ व्यक्त केली.अभिषेक व विजय हे प्रगतशील शेतकरी अर्जुन पाटीलबा दरंदले यांचे नातू तसेच, माजी पंचायत समिति सदस्य अण्णासाहेब दरंदले यांच्या कुटुंबातील होते. रामेश्वर मराठे हे बाळासाहेब मराठे यांचे एकुलते एक पुत्र होते, तर गणेश दरंदले यांनाही अभिषेक व विजय हिच दोन मुले होती. त्यामुळे या दुर्दैवी घटनेने दोन्ही कुटुंबांवर मोठा आघात झाला आहे.

**■ या दुर्घटनेत ट्रॅक्टरखाली तिघेही अडकल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. ग्रामस्थांनी तात्काळ धाव घेत ट्रॅक्टर सरळ करून तिघांना बाहेर काढले. मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. नेवासा येथे शवविच्छेदनानंतर मंगळवारी सायंकाळी रामेश्वर मराठे यांच्यावर खरवंडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.तर, बुधवारी सकाळी अभिषेक व विजय दरंदले या दोन्ही भावांवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.**

# दरोड्याच्या तयारीतील पुण्याच्या मेहंदळे टोळीच्या मुस्क्या आवळल्या

**हत्यारांसह चौघे गजाआड, एक फरार**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरातील भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोडा टाकण्याच्या उद्देशाने घातक हत्यारांसह एकत्र आलेल्या चार सराईत गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून रंगेहात अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून एक गावठी पिस्तुल, जिवंत काडतूस, कोयता, चाकू आणि मिरची पूड असा एकूण १ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांवर गुन्हा दाखल केला असून एकाचा शोध सुरू आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, बुहानगर रोडवरील मिरावली पहाडाच्या पायथ्याशी काही तरुण संशयास्पद रित्या थांबले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी आणि पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे यांच्या पथकाने वारूळवाडी परिसरात छापा टाकला. यावेळी पोलिसांनी मुस्ताक इब्राहिम शेख (वय २२), विराट ऊर्फ विल्यम रवींद्र मेहंदळे (वय २६), समर्थ बाबासाहेब **(पान ४ वर)**

# ब्राह्मणी येथे दोघांच्या भांडणात एकाचा मृत्यू

### पोलीस उपाधीक्षक जयदत्त भवर, पोलीस निरीक्षक ठेंगे यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी !!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** राहुरी तालुक्याच्या पूर्व भागात असणाऱ्या ब्राह्मणी येथील बस स्थानक जवळ असणाऱ्या परिश सायकल मार्टसमोर २७ मे २०२६ दुपारी सत्यवान भाऊसाहेब साठे व सुशील मधुकर साठे यांच्यात काही कारणास्तव किरकोळ भांडणे झाले असून त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. त्यात सत्यवान भाऊसाहेब साठे वय वर्ष ३० यांचा मृत्यू झाल्याने परिसरामध्ये एकच खळबळ उडाली.

सदर या घटनेची माहिती समजताच डी वाय एस पी जयदत्त भवर राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे आपल्या पथकासह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. घटना घडलेल्या या सायकल दुकान च्या शेजारीच असणाऱ्या माऊली फोटो स्टुडिओमध्ये सीसीटी कॅमेरा असल्याने सदरच्या कॅमेऱ्यातील फुटेज पोलीस प्रशासनाने हस्तगत केले असल्याने नेमका काय प्रकार झाला तो उजेडात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे नेमके प्रकरण काय याची सत्यता समोर येणार आहे. दरम्यान घटने संदर्भात रात्री उशिरापर्यंत राहुरी पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

# एसआयआर मोहीम वैध : सर्वोच्च न्यायालयाकडून निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे समर्थन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीवेळी वादग्रस्त आणि प्रचंड चर्चेचा विषय ठरलेल्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण अर्थात एसआयआर मोहीम वैध असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने यासंदर्भात बुधवारी महत्त्वपूर्ण निकाल सुनावला. यावेळी खंडपीठाने आपले निरीक्षण नोंदवताना म्हटले की, निवडणूक आयोगाने आपल्या अधिकाराचा वापर केला आहे. आपल्या अधिकाराच्या कक्षेबाहेर त्यांनी काहीही केलेले नाही. त्यामुळे एसआयआर मोहीमेला असंवैधानिक ठरवता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.



सर्वोच्च न्यायालयाने एसआयआर संदर्भातली याचिकांवर सुनावणी झाल्यानंतर यासंदर्भातील निर्णय राखून ठेवला होता.

या निकालात सर्वोच्च न्यायालयाने एसआयआर मोहीम वैध असल्याचा निकाल दिला. या प्रक्रियेला चुकीचे ठरवता येणार नाही. मतदार याद्यांचा फेरआढावा घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. लोकप्रतिनिधी कायदा १९५० नुसार हा अधिकार निवडणूक आयोगाला आहे. विशेष मतदार यादी पुर्ननिरीक्षण करण्याचे आणि सगळ्या मतदार याद्यांचे पुनरावलोकन करण्याचे अधिकार घटनेने दिले आहेत. संविधानातील निवडणूक आयोगाशी संबंधित कलमांमध्ये अनुच्छेदात लिहलं आहे, निवडणूक आयोग मतदार यादी तयार करेल आणि तिची फेररचना करेल. त्यामुळे एसआयआर मोहीम वैध ठरते, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले.

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने या राज्यात एसआयआर मोहीम राबवली होती. त्यामध्ये निवडणूक यादीतील जवळपास ९० लाख मतदारांना वगळण्यात आले होते. या निर्णयानंतर प्रचंड गदारोळ झाला होता. निवडणूक यादीतून नावं वगळण्यात आलेल्यांमध्ये बहुतांश मुस्लीम मतदारांचा समावेश असल्याचा आणि हे जाणीवपूर्वक केल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. यापैकी काही मतदारांना पुन्हा मतदार यादीत पुन्हा सामावून घेण्यात आले होते. मात्र, हे प्रमाण अत्यंत नगण्य होते. यामुळे पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावर प्रभाव पडल्याचा आरोप विरोधकांनी केला होता.

# जगासमोर अन्न संकटाचा धोका

### संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** मध्य पूर्वेतील वाढत्या संघर्षामुळे होर्मुझ सामुद्रधुनीवरील तणाव अधिक तीव्र झाला असून त्याचा परिणाम आता जागतिक अर्थव्यवस्थेसह अन्नसुरक्षेवरही होऊ लागला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेने याबाबत गंभीर इशारा देत जगासमोर मोठ्या अन्नसंकटाचा धोका उभा असल्याचे म्हटले आहे.



जागतिक अन्न व कृषी संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळे हे केवळ जहाज वाहतुकीतील तात्पुरते संकट नसून जागतिक पुरवठा साखळीला हादरा देणारी मोठी आर्थिक आपत्ती ठरू शकते. यामुळे पुढील सहा ते बारा महिन्यांत अन्नधान्याच्या किमती प्रचंड वाढू शकतात आणि अनेक देशांमध्ये अन्नटंचाईची स्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. एफएओचे मुख्य अर्थतज्ज्ञ मॅक्सिमो टेरेनो यांनी स्पष्ट केले की, सर्व देशांनी आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी तातडीने सक्रिय होण्याची गरज आहे. त्यांच्या मते, सरकारे, वित्तीय संस्था आणि खासगी क्षेत्राने एकत्रितपणे संकटाचा सामना करण्यासाठी काम केले नाही, तर त्याचा सर्वाधिक फटका गरीब देश, लहान शेतकरी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना बसणार आहे.

जागतिक व्यापारात होर्मुझ सामुद्रधुनीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. तेल, वायू आणि इतर वस्तूंची वाहतूक या मार्गाने **(पान ४ वर)**

# हॉटेलच्या कामावरून आचाऱ्याचा खून, तीन परप्रांतीय अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** कर्जत शहरातील हॉटेल गौरव येथे काम करणाऱ्या आचाऱ्याचा तेथीलच वेटरच्या काम करणाऱ्या तिन्ही परप्रांतीय मजुरांनी मारहाण करून गळा आवळत खून केला. या घटनेत कर्जत आणि श्रीगोंदा पोलीस दलाने अवघ्या एका तासात तपास सूत्रे हलवीत तीन जणांना ताब्यात घेण्यात यश मिळवले व खुनाचा उलगडा केला. समीर अकबर शेख असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे.

कर्जत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कर्जत-नगर रोडवरील जोगेश्वरवाडी शिवारातील हॉटेल गौरव या ठिकाणी मयत समीर शेख हा आचारी म्हणून काम करीत होता. याच ठिकाणी उत्तरप्रदेश येथील वेटरचे काम करणारे राज हरीनाम गुप्ता, दुखहरण तिरथराज गौतम आणि त्यांचा मित्र मनोज सबुरीलाल गौतम यांच्यात हॉटेलच्या कामावरून बुधवार, दि २७ रोजी पहाटे चार ते पाच वाजेच्या सुमारास वाद झाला. या वादात वरील तिन्ही युवक आणि आचारी काम करणारा समीर शेख यांच्यात झटापट होत शेख याचे डोके लोखंडी पलंगावर आपटले. तदनंतर शेख याचा कापडी पंचाने तिघांनी गळा आवळत खून केला. घटनास्थळी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, कर्जतचे पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे, पोलीस निरीक्षक सोपान शिरसाट यांनी भेट देत तपासाची सूत्रे फिरवली. सदरच्या घटनेनंतर तिन्ही आरोपी उत्तरप्रदेश आपल्या गावी जाण्यासाठी पलायन करीत असताना कर्जत आणि श्रीगोंदा पोलिसांच्या संयुक्त पथकाने त्यांना काष्टी **(पान ४ वर)**

# अकोल्यातील ५५ अल्पवयीन मुली गरोदर; बालहक्कांपुढे उभा राहिला गंभीर प्रश्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अकोले :** अकोले तालुक्यात समोर आलेल्या एका धक्कादायक वास्तवाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. तालुक्यात तब्बल ५५ अल्पवयीन मुली गरोदर असल्याची माहिती महिला व बालविकास विभागाच्या सर्वेक्षणातून उघड झाली असून, यातील ५४ मुलींचे बालविवाह झाल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, एका अल्पवयीन मुलीला विवाह न होताही गर्भधारणा झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

या आकडेवारीने केवळ प्रशासनालाच नव्हे, तर समाजालाही अंतर्मुख करणारा प्रश्न निर्माण केला आहे. बालविवाह, गरिबी, सामाजिक दबाव आणि बदनामीच्या भीतीमुळे अजूनही अनेक मुलींचे बालपण हरवत असल्याचे या घटनेतून स्पष्ट होत आहे.

महिला व बालविकास विभाग यांच्या माध्यमातून अकोले व राजूर प्रकल्पांतर्गत अंगणवाडी सेविकांकडून दरमहा गरोदर व स्तनदा मातांचे सर्वेक्षण केले जाते. याच पाहणीत ही गंभीर बाब उघडकीस आली. काही अल्पवयीन मुलींची प्रसूतीदेखील झाल्याचे समोर आल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे, केंद्र सरकारच्या मातृत्व वंदना योजना अंतर्गत लाभासाठी आलेल्या अर्जांमध्येही या मुलींची नावे आढळून आली. त्यामुळे अनेक बालविवाह आणि अल्पवयीन गर्भधारणा अधिकृत नोंदीत नसल्याची भीती व्यक्त होत आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत महाराष्ट्र राज्य बालहक्क आयोग यांच्याकडे चौकशीची मागणी करण्यात आली आहे. अकोले बालसंरक्षण समितीचे अशासकीय सदस्य श्रीनिवास रेणुकादास यांनी ग्रामस्तरावर बालसंरक्षण समित्या सक्रिय करण्याची, विवाहावेळी जन्मदाखला सक्तीचा करण्याची आणि अल्पवयीन मुलींशी विवाह करणाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. अकोल्यातील हे वास्तव केवळ आकडेवारी नाही, तर हरवत चाललेल्या बालपणाची वेदनादायक कहाणी आहे. शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षित भविष्य मिळण्याआधीच संसाराच्या ओझ्याखाली दबल्या जाणाऱ्या मुलींचा हा प्रश्न आता समाजाने गांभीर्याने घेण्याची गरज व्यक्त होत आहे.



**■ स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, मुलगी पळून जाईल, समाजात बदनामी होईल या भीतीमुळे अनेक पालक मुलींची अल्पवयातच लग्ने लावून देतात. कायदेशीर कारवाईच्या धाकामुळे अनेक प्रकरणे दडपली जातात. त्यामुळे प्रत्यक्षातील संख्या अधिक असण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

# ‘नीट’चा फेरविचार आता अपरिहार्य

भारतातील वैद्यकीय शिक्षण प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली ‘नीट’ परीक्षा आज गंभीर प्रश्नांच्या भोवऱ्यात अडकली आहे. ‘नीट-२०२६’ पेपरफुटी प्रकरणाने केवळ परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी उघड केल्या नाहीत, तर शिक्षण व्यवस्थेतील वाढते व्यापारीकरण, सामाजिक विषमता आणि सार्वजनिक संस्थांची कमकुवत होत चाललेली अवस्था यांनाही समोर आणले आहे. लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित असलेली ही परीक्षा आज विश्वासार्हतेच्या संकटात उभी आहे. त्यामुळे ‘नीट’चा फेरविचार आता केवळ आवश्यक नाही, तर अपरिहार्य बनला आहे.

‘नीट’चा मूळ हेतू एकसमान प्रवेश प्रक्रिया निर्माण करणे हा होता. राज्यनिहाय परीक्षा, त्यातील भ्रष्टाचार, वेगवेगळे निकष आणि प्रवेश प्रक्रियेतील अनियमितता यांना आळा घालण्यासाठी ही परीक्षा लागू करण्यात आली. मात्र भारतासारख्या विषम समाजात ‘एकसमान परीक्षा’ म्हणजे ‘एकसमान संधी’ असे कधीच होत नाही, हे वास्तव आता अधिक स्पष्टपणे समोर आले आहे. ग्रामीण आणि शहरी, इंग्रजी आणि मातृभाषा, श्रीमंत आणि गरीब, खासगी आणि सरकारी शिक्षण यांमधील दरी इतकी मोठी आहे की एकाच प्रश्नपत्रिकेसमोर सर्व विद्यार्थ्यांना समान समजणे हीच मुळात अन्यायकारक भूमिका ठरते.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील परिस्थिती पाहिली, तर हा प्रश्न अधिक तीव्रतेने जाणवतो. अहिल्यानगर, मराठवाडा, विदर्भ किंवा उत्तर महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांकडे आजही दर्जेदार विज्ञान शिक्षणाच्या मूलभूत सुविधा नाहीत. अनेक शाळांत प्रयोगशाळा नाहीत, प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता आहे, डिजिटल शिक्षणाची साधने नाहीत. दुसरीकडे महानगरांतील खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडे आधुनिक सुविधा, कोचिंग क्लासेस, ऑनलाइन मार्गदर्शन आणि लाखो रुपयांची तयारी करण्याची क्षमता असते. अशा परिस्थितीत ‘नीट’ची गुणवत्ता मोजण्याची पद्धत ही प्रत्यक्षात सामाजिक आणि आर्थिक विशेषाधिकारांची परीक्षा ठरते.

‘नीट’च्या तयारीभोवती उभा राहिलेला कोचिंग उद्योग हा आणखी चिंतेचा विषय आहे. कोटा, पुणे, हैदराबाद यांसारख्या शहरांमध्ये हजारो कोटी रुपयांची उलाढाल करणारी कोचिंग व्यवस्था तयार झाली आहे. वैद्यकीय शिक्षण हे आता गुणवत्तेपेक्षा पैशांवर आधारित स्पर्धा बनत चालल्याचे चित्र आहे. गरीब, शेतकरी किंवा कामगार कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत कठीण ठरते. अनेक पालक कर्ज काढून मुलांना कोचिंगसाठी पाठवतात; पण एका परीक्षेतील अपयशाने संपूर्ण कुटुंब कोलमडून जाते. विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटना हा या व्यवस्थेचा अत्यंत वेदनादायी परिणाम आहे.



तमिळनाडूने ‘नीट’विरोधात घेतलेली भूमिका याच कारणांमुळे महत्त्वाची ठरते. त्या राज्याने सातत्याने असा मुद्दा मांडला की, ‘नीट’मुळे ग्रामीण, सरकारी शाळांमधील आणि मातृभाषेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे वैद्यकीय शिक्षणातील प्रमाण घटले आहे. भाषिक आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने हा मुद्दा दुर्लक्षित करता येणार नाही. महाराष्ट्रातही मराठी माध्यमातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजीकेंद्री प्रश्नपद्धतीचा फटका बसतो. प्रश्नांचे स्वरूप, वैज्ञानिक संकल्पनांची मांडणी आणि स्पर्धेचे वातावरण हे सर्व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना अधिक अनुकूल ठरते.

‘नीट’मधील पेपरफुटी प्रकरणाने आणखी एक गंभीर वास्तव समोर आणले आहे. परीक्षा व्यवस्थेचे वाढते खासगीकरण आणि त्यातून निर्माण झालेला ‘पेपर माफिया’ हा शिक्षण क्षेत्रासाठी मोठा धोका बनला आहे. परीक्षा प्रक्रियेतील अनेक कामे खासगी कंपन्यांकडे सोपवण्यात आली आहेत. नफा आणि करार यांवर चालणाऱ्या या व्यवस्थेत उत्तरदायित्वाचा अभाव निर्माण होतो. सार्वजनिक संस्थांची क्षमता कमी होत असताना भ्रष्टाचाराला वाव मिळतो. त्यामुळे प्रश्न केवळ एका पेपरफुटीचा नाही; तर शिक्षण क्षेत्रातील नियंत्रण आणि विश्वासार्हतेच्या संपूर्ण मॉडेलचा आहे.

याचा अर्थ ‘नीट’सारखी कोणतीही परीक्षा नको, असा नाही. वैद्यकीय शिक्षण प्रवेशात पारदर्शकता आणि गुणवत्ता आवश्यकच आहे. मात्र त्यासाठी केवळ एक केंद्रीकृत परीक्षा हा एकमेव पर्याय असू शकत नाही. शिक्षणातील मूलभूत विषमता दूर न करता ‘गुणवत्ता’चा आग्रह धरणे म्हणजे अन्यायाला वैधता देणे होय.

त्यामुळे आता काही मूलभूत उपायांची गरज आहे. सरकारी शाळांमधील विज्ञान शिक्षणाचा दर्जा उंचावणे, ग्रामीण भागात प्रयोगशाळा आणि प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध करणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी मोफत कोचिंग सुविधा निर्माण करणे, मातृभाषेतून परीक्षा देण्याची प्रभावी व्यवस्था करणे आणि प्रवेश प्रक्रियेत सामाजिक-आर्थिक निकषांचा विचार करणे हे अत्यावश्यक आहे. वैद्यकीय शिक्षण हे बाजारपेठेतील उत्पादन नसून सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा पाया आहे, ही भूमिका सरकारने स्पष्टपणे स्वीकारली पाहिजे.

आजचा प्रश्न केवळ ‘नीट’ परीक्षेचा नाही; तर शिक्षण व्यवस्थेच्या भवितव्याचा आहे. डॉक्टर होण्याचे स्वप्न हे केवळ श्रीमंतांच्या मुलांसाठी राखीव राहणार की ग्रामीण, शेतकरी, कामगार आणि वंचित समाजातील विद्यार्थ्यांनाही समान संधी मिळणार, हा खरा मुद्दा आहे. शिक्षणातील विषमता कायम ठेवून समान परीक्षेची भाषा करणे हा क्रूर विरोधाभास आहे. म्हणूनच ‘नीट’चा फेरविचार हा केवळ शैक्षणिक सुधारणा नसून सामाजिक न्यायाच्या लढ्याचा भाग बनला आहे.

## राहुरीत अंधश्रद्धेविरोधात संघटनात्मक बांधणी

### अंनिसच्या तालुका अध्यक्षपदी प्रा. वसंत झावरे



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : अंधश्रद्धा, बुवाबाजी आणि अनिष्ट रूढींविरोधात समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन व विवेकवादी विचारांची चळवळ अधिक बळकट करण्याचा निर्धार महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राहुरी तालुका कार्यकारिणीच्या बैठकीत व्यक्त करण्यात आला. गुहा (ता. राहुरी) येथील गंगाधर बाबा छात्रालयात झालेल्या बैठकीत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. वसंतराव झावरे यांची तालुका अध्यक्षपदी, तर डॉ. जालिंदर घिगे यांची कार्याध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा कार्याध्यक्ष मधुकर अनाप होते. यावेळी उपाध्यक्षपदी दिपक मेहेत्रे व डॉ. रोहित बोरावके, सचिवपदी संजय चव्हाण, तर सहसचिवपदी साईनाथ रणधीर यांची निवड जाहीर करण्यात आली. विविध विभागांसाठी पदाधिकाऱ्यांची निवड करून संघटनात्मक जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या.

बुवाबाजी संघर्ष विभागासाठी योगेश तनपूरे व जालिंदर मुसमाडे, वैज्ञानिक जाणीव प्रकल्पासाठी बबनराव लांडगे, स्वप्निल कडू व शुभम साबळे, तर मानसिक आरोग्य विभागासाठी डॉ. पूनम साबळे व डॉ. कौस्तुभ भागवत यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली. महिला विभाग प्रमुख म्हणून सोनल झावरे, युवा विभाग प्रमुख म्हणून मनोज खाटेकर, तर सोशल मीडिया प्रसिद्धी विभागासाठी स्वप्निल दिघे व आदेश अंत्रे यांची नियुक्ती करण्यात आली.

बैठकीस रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य किरण कडू, नगर शहर शाखेचे कार्याध्यक्ष राजेंद्र कर्डिले, समता परिषदेचे विभागीय अध्यक्ष मच्छिंद्र गुलदगड, कृषी अधिकारी बाबासाहेब मुसमाडे तसेच विविध क्षेत्रांतील कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय मनोगतात मधुकर अनाप यांनी, अंनिस कोणत्याही धर्माच्या विरोधात नसून समाजात शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा प्रसार करण्याचे कार्य करत आहे, असे स्पष्ट केले. समाजातील अंधश्रद्धा, बुवाबाजी आणि शोषण करणाऱ्या प्रवृत्तींविरोधातील लढा अधिक तीव्र करण्यात येईल, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

## धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनीतील शिवरस्ता खुला करा : अन्यथा आंदोलन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील मुकिंदपुर (काळेगांव) येथील जायकवाडी धरणग्रस्तांना मुकिंदपुर-भानसहिवरे शिवेलगत जमीनी मिळालेल्या आहेत.सदर शिवरस्त्यावर काही पूर्वीच्या शेतकऱ्यांनी अतिक्रमण करुन शिवरस्ता मोडला आहे. त्यामुळे धरणग्रस्त शेतकऱ्यांना जमीनी मिळुनही शेतीमध्ये जाण्या-येण्यासाठी औजारे वाहीतीसाठी अनेक वर्षापासुन अडचण निर्माण झालेली आहे. धरणग्रस्त शेतकऱ्यांना मिळालेल्या जमिनीतील शिवरस्ता खुला करा अन्यथा अन्यथा धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबासमवेत आंदोलन करू असा ईशारा धरणग्रस्त शेतकरी सखाराम साठे यांनी दिला आहे. शासन दरबारी अर्ज, विनंत्या केलेल्या आहेत परंतु अद्यापपर्यंत रस्ता खुला झालेला नाही, भुमी अभिलेख खात्याकडे चौकशी केली असता शिवरस्ता साठी ६ महिने मुदत दिलेली आहे. तो पर्यंत शेतात पिके, वहिवाट कशी करायची शेती, पाणी असुन पिके उत्पन्न घेता येत नाही, शेजारील शेतकरी शेतात जाऊ देत नाही, धरणग्रस्त शेतकयांच्या कुटुंबाबर उपासमारीची वेळ आलेली आहे. तरी शासनाने आमचा रस्ता पावसाळयाच्या पूर्वी खुला व चालु करुन द्यावा. अन्यथा धरणग्रस्त शेतकऱ्यांना बरोबर घेऊन कुटुंबासह उपोषण करणार असल्याचा इशारा धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या वतीने सखाराम साठे यांनी दिला आहे.

## हुमणी अळीचे एकात्मिक नियंत्रण हाच पर्याय: तालुका कृषी अधिकारी भोरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : हुमणी अळीचे ऊस शेतीवरील मोठे संकट आहे.ते आता इतर पिकांवरही येऊ लागले आहे.औषधे हा त्यावरील प्रभावी उपाय नसून अळीचे एकात्मिक नियंत्रण हा एकच पर्याय असल्याचे प्रतिपादन राहाता तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे यांनी केले.

लोणी बुद्रुक येथिल अर्जुन लक्ष्मण विखे यांच्या वस्तीवर कृषी विभागाच्या वतीने क्रॉप सॅप अंतर्गत ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी शेती शाळा भरवली होती.शाळेचा हा पहिला वर्ग होता. मे ते ऑक्टोबर याकाळात सहा वर्ग भरवण्यात येणार आहेत.

शेतीशाळेला कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. शैलेश देशमुख, तालुका कृषी अधिकारी राहाता आबासाहेब भोरे, लोणी मंडल कृषी अधिकारी रमेश चोपडे, उप कृषी अधिकारी वैशाली अडसुरे, सहाय्यक कृषी अधिकारी संध्या महागडे, कृत्तिका शहाणे तसेच प्रगतिशील शेतकरी नाना म्हस्के,बाळासाहेब वाबळे, अण्णासाहेब म्हस्के, अर्जुन विखे, दत्तात्रय म्हस्के, दादासाहेब म्हस्के, विकास म्हस्के, गोकुळ विखे, ज्ञानदेव म्हस्के, सुभाष म्हस्के, गोविंद म्हस्के, रमेश घोलप, सुभाष दिघे,प्रकाश दिघे,एकनाथ म्हस्के,धनंजय म्हस्के,शशिकांत म्हस्के व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना भोरे म्हणाले की, हुमनी अळीमुळे ऊस पिकाच्या मुळांवर परिणाम होऊन उत्पादनात मोठी घट येते. त्यामुळे शेतकऱ्यांनी उन्हाळी खोल नांगरट करणे, वेळेवर आंतरमशागत करणे, प्रकाश सापळ्यांचा वापर करणे, तसेच जैविक व रासायनिक उपाययोजना एकात्मिक पद्धतीने राबविणे आवश्यक आहे. सेंद्रिय खतांचा संतुलित वापर आणि शेतातील ओलावा व्यवस्थापन यावरही भर द्यावा.

ेशमुख म्हणाले,जमिनीची मशागत,लागवड,खत,पाणी आणि किड नियंत्रण व्यवस्थापन या पंचसूत्रीचा शेतकऱ्यांनी वापर करावा.सेंद्रिय व जिवाणू खतांचा वापर,क्षारयुक्त जमिनीत सबसोयलरचा वापर काळाची गरज आहे.माती,पाणी परीक्षण व त्यानुसार खतांचा वापर करावा.योग्य तणनाशक पिकाच्या अवस्थेनुसार वापरावे.बेणे निरोगी असावे.पिकाच्या गरजेनुसार पाण्याचे व्यवस्थापन करावे.

यावेळी बियाणे उगवण क्षमता तपासणीबाबत डेमो घेण्यात आला. हुमणी अळी नियंत्रण सापळ्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. एल-निनोच्या प्रभावामुळे खरीप हंगामात पावसाचे अनियमित स्वरूप राहण्याची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी कमी कालावधीत येणाऱ्या वाणांची निवड करावी, पाणी साठवणूक व सूक्ष्म सिंचनाचा वापर वाढवावा, पीक नियोजन काळजीपूर्वक करावे असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले.स्वागत दादासाहेब म्हस्के यांनी तर प्रास्ताविक संध्या महागडे यांनी केले.



ऊस उत्पादक शेती शाळेत मार्गदर्शन करताना आबासाहेब भोरे,समवेत डॉ.शैलेश देशमुख,नाना म्हस्के,बाळासाहेब वाबळे व मान्यवर

## मुळा सहकारी साखर कारखान्याची निवडणूक शेतकरी संघटना लढविणार : तूवर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : नेवासा तालुक्यातील मुळा सहकारी साखर कारखान्याची निवडणूक नुकतीच जाहीर झाली आहे. कारखाना स्थापनेपासून एकाच घराण्याकडे सत्ता असल्याने शेतकरी हिताचे कुठलेच निर्णय घेतले जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटना ताकतीने निवडणूक लढविणार असल्याचे संघटनेचे उपाध्यक्ष हरी आप्पा तूवर यांनी जाहीर केले आहे. सभासदांना इतर कारखान्यापेक्षा नेहमीच ऊस दर कमी दिलेला आहे, कार्यक्षेत्राबाहेरील ऊस आणल्याने कार्यक्षेत्रातील सभासदांच्या ऊसाला उशिरा तोड दिल्याने वजनात घट येते, त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. मुळा कारखान्याने सह विज प्रकल्पासारखे उपपदार्थ निर्मितीतून मिळणारा नफा शेतकऱ्यांना दिला गेला नाही, यावर्षी निवडणूक असल्याने २७०० ऐवजी रुपये ३००० टनाला भाव जाहीर केला आहे. मुळा बँक, मुळा बाजारासाठी सभासदाकडून रु.१००० टनाप्रमाणे कपात केली आहे, याचा देखील सभासदांना फायदा झाला नाही. या सर्व कारणामुळे ॲड अजित काळे (उपाध्यक्ष शेतकरी संघटना ,महाराष्ट्र राज्य) यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेतकरी संघटना ताकतीने निवडणूक लढविणार असल्याचे शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष हरी आप्पा तूवर यांनी जाहीर केले आहे. तसे पत्रक काढून मेजर अशोक काळे (अध्यक्ष- नेवासा तालुका शेतकरी संघटना) प्रा. कार्लस साठे (प्रभारी व प्रवक्ते शेतकरी संघटना अहिल्यानगर) ॲड भाऊसाहेब कावळे(कायदेशीर सल्लागार, शेतकरी संघटना) बंडोपंत चौगुले (जिल्हा परिषद गट बेल पिंपळगाव गट उमेदवार) किरण लंघे, रोहित कुलकर्णी (युवा आघाडी, शेतकरी संघटना नेवासा) बापूसाहेब देशमुख, दादासाहेब नाबदे, बाबासाहेब नागोडे, भाऊसाहेब काळे, बाबासाहेब खराडे इत्यादींनी आवाहन केले आहे.तरी मेजर अशोक काळे ९९७०६६१६८७/२ ॲड. भाऊसाहेब कावळे ७०५७३७६७९७ यांच्याशी उमेदवारीसाठी इच्छुकांनी संपर्क साधावा असे आवाहन शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आयोजित लाभार्थी मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, नेवासा तालुका यांच्या वतीने कुकाणा येथे आयोजित करण्यात आलेल्या लाभार्थी मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला या मेळाव्याच्या निमित्ताने गुणवंतांचा सत्कार समारंभ आणि जनसंवाद कार्यक्रमाचे ही आयोजन यावेळी करण्यात आले होते.

यावेळी बोलताना अब्दुल शेख म्हणाले, स्व. दादांनी आम्हाला समाजासाठी काम करण्याची प्रेरणा दिली. गोरगरीब, वंचित, शेतकरी, कामगार आणि सामान्य नागरिकांच्या पाठीशी उभे राहण्याची ताकद त्यांनी दिली. दादांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आम्ही शेवटच्या श्वासापर्यंत जनतेसाठी लढत राहू. आपल्या सर्वांच्या प्रेम, आशीर्वाद आणि पाठिंब्यामुळेच जनतेसाठीची ही लढाई अधिक ताकदीने सुरू आहे.





या मेळाव्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंतांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, नेवासा तालुका यांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला.

ानेश्वरी रवी रींधे हिने फुटबॉलमध्ये महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करून तालुक्याचे नाव राज्यभर उज्ज्वल केले. पिंपरी शहाली येथील कबड्डी संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून गावाचा आणि तालुक्याचा मान उंचावला. या सर्व गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आा.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आ. पांडुरंग अभंग यांनी आपल्या मार्गदर्शनात स्व. दादांच्या कार्याची आठवण करून देत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. महिला नेत्या आशाताई बाळासाहेब मुरकुटे यांनी भैय्या, तुम्ही गोरगरिबांसाठी असेच लढत राहा, बहिण म्हणून आम्ही कायम तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, असा विश्वास व्यक्त केला.

तालुका अध्यक्ष अशोक मोरे यांनी आभार मानले. जिल्हा उपाध्यक्ष विलास देशमुख यांनी प्रास्ताविक केले.

याप्रसंगी अनिल नाबदे, सुहास टेमक, अंबादास गायकवाड, जुम्माभाई पठाण, अण्णासाहेब गव्हाणे, मकरंद राजहंस, नवथर पाटील, राजूभाई शेख, समर्थ गायकवाड, इरफान पठाण तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय क्रीडा प्रशासनात मोठी सुधारणा;

## नव्या नियमांनी वाढणार खेळाडूंचा विश्वास

भारतीय क्रीडा क्षेत्रामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून पारदर्शकता, संघटनांमधील वाद, निवड प्रक्रियेवरील प्रश्नचिन्ह, आर्थिक गैरव्यवहार आणि खेळाडूंना वेळेत न्याय न मिळणे यांसारख्या अनेक समस्या सातत्याने समोर येत होत्या. अनेक वेळा खेळाडूंना त्यांच्या हक्कांसाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे लागत होते, तर काही वेळा संघटनांतील अंतर्गत राजकारणामुळे प्रतिभावान खेळाडूंना संधीपासून वंचित राहावे लागत होते. या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने भारतीय क्रीडा व्यवस्थापनात मोठे आणि ऐतिहासिक बदल घडवून आणण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्र सरकारने राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम २०२५ अंतर्गत राष्ट्रीय क्रीडा मंडळ नियम २०२६ आणि राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरण नियम २०२६ जाहीर केले आहेत. भारतीय क्रीडा क्षेत्र अधिक मजबूत, शिस्तबद्ध, पारदर्शक आणि खेळाडू-केंद्रित बनवण्याच्या दृष्टीने हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. या नव्या नियमांमुळे देशातील राष्ट्रीय क्रीडा महासंघांच्या कामकाजावर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवले जाणार असून खेळाडूंना न्याय मिळवण्यासाठी स्वतंत्र आणि जलद व्यवस्था उपलब्ध होणार आहे.

राष्ट्रीय क्रीडा मंडळाची स्थापना ही भारतीय क्रीडा व्यवस्थेतील एक महत्त्वाची सुधारणा ठरणार आहे. हे मंडळ राष्ट्रीय क्रीडा संघटनांच्या कामकाजावर देखरेख ठेवणार आहे. संघटनांचे आर्थिक व्यवहार, निवड प्रक्रिया, प्रशासनिक निर्णय, नैतिक मूल्यांचे पालन आणि पारदर्शकता यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. क्रीडा क्षेत्रात अनेकदा आर्थिक अनियमितता, निवड प्रक्रियेतील पक्षपात आणि प्रशासनातील अपारदर्शकता याबाबत तक्रारी होत असतात. आता या मंडळामुळे अशा प्रकारांवर नियंत्रण ठेवले जाणार आहे. मंडळामध्ये अध्यक्ष आणि सदस्यांची नियुक्ती केंद्र सरकारमार्फत निवड समितीच्या शिफारशीनुसार केली जाणार असल्याने प्रशासन अधिक जबाबदार आणि विश्वासार्ह होण्याची अपेक्षा आहे.

यासोबतच राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरणाची स्थापना ही खेळाडूंना न्याय देण्यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. अनेक वेळा खेळाडूंना निवड प्रक्रियेतील अन्याय, निलंबन, करार, संघटनांमधील वाद किंवा इतर प्रशासकीय समस्यांबाबत न्याय मिळवण्यासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागत होती. आता स्वतंत्र क्रीडा न्यायाधिकरणामुळे हे वाद जलद, सुलभ आणि कमी खर्चात सोडवले जाणार आहेत. कायदा, क्रीडा व्यवस्थापन आणि वाद निवारण क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य या न्यायाधिकरणामध्ये असतील. त्यामुळे खेळाडूंना योग्य आणि निष्पक्ष न्याय मिळण्यास मदत होणार आहे. विशेष म्हणजे या न्यायाधिकरणाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील करण्याचीही तरतूद करण्यात आली आहे.

या नव्या व्यवस्थेमुळे खेळाडूंना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. सर्वप्रथम निवड प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता येणार असल्याने गुणवत्तेला प्राधान्य मिळेल. खेळाडूंना त्यांच्या मेहनतीनुसार संधी मिळण्याची शक्यता वाढेल. संघटनांमधील राजकारण, पक्षपात किंवा अन्यायकारक निर्णयांवर नियंत्रण येईल. महिला खेळाडूंच्या सहभागाला अधिक प्रोत्साहन मिळणार असून सुरक्षित आणि समान संधीचे वातावरण तयार होणार आहे. खेळाडूंच्या हक्कांचे संरक्षण अधिक मजबूत होईल आणि त्यांना न्यायासाठी वर्षानुवर्षे संघर्ष करावा लागणार नाही.

भारतीय क्रीडा व्यवस्थेला जागतिक स्तरावरील मानके मिळवून देण्यासाठी ही सुधारणा अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. जगातील अनेक विकसित देशांमध्ये क्रीडा प्रशासनासाठी स्वतंत्र आणि पारदर्शक व्यवस्था कार्यरत आहे. आता भारतही त्या दिशेने मोठे पाऊल टाकत आहे. या नव्या नियमांमुळे भारतीय क्रीडा क्षेत्र अधिक व्यावसायिक, शिस्तबद्ध आणि विश्वासार्ह होईल. तसेच देशातील तरुण खेळाडूंमध्ये आत्मविश्वास वाढेल आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची कामगिरी अधिक भक्कम होण्यास मदत मिळेल.केंद्र सरकारने घेतलेला हा निर्णय केवळ प्रशासकीय बदल नसून भारतीय क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देणारा ऐतिहासिक टप्पा आहे. खेळाडू, प्रशिक्षक, क्रीडा संस्था आणि क्रीडाप्रेमी नागरिक यांच्यासाठी ही एक सकारात्मक आणि आशादायी सुरुवात मानली जात आहे. भविष्यात भारतीय खेळाडूंना अधिक सुरक्षित, न्याय्य आणि प्रोत्साहनात्मक वातावरण मिळाल्यास भारत जागतिक क्रीडा महासत्ता बनण्याच्या दिशेने अधिक वेगाने पुढे जाईल, यात शंका नाही.



**गौरव अरविंद डेंगळे**
FIVB Level **१ व्हॉलीबॉल प्रशिक्षक.**
**८७९३३२१५१५**

## राजुरी येथे प्रवरेच्या कृषीदुतांचे आगमन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : राहाता तालुक्यातील राजुरी येथे कृषी महाविद्यालय ,लोणी येथील कृषीदुतांचे आगमन झाले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी या कृषीदुतांचे स्वागत केले. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे व महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्नित कृषी महाविद्यालय, लोणी येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे अध्यक्ष व राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने व संस्थेच्या मुख्य कार्यकारी आधिकारी डॉ.सुस्मिता विखे पाटील आणि कृषी शिक्षण संचालक डॉ. उत्तम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व कृषी महाविद्यालय लोणीचे प्राचार्य डॉ. अमोल खडके , कार्यक्रम समन्वयक डॉ. रमेश जाधव, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप आणि प्रा. अक्षया वाळुंज यांच्या सूचनेनुसार कृषीदुत बारसे योगेश पिराजी, भामरे यश सुनील, दोषी आयुष विपीन,कोल्हे प्रज्वल गजानन हे राजुरी येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी ग्रामपंचायत राजुरीच्या सरपंच संगीता पठारे ,उपसरपंच डॉ. सोमनाथ गोरे , ग्रामविकास अधिकारी वैशाली तोडमल, ग्रामपंचायत कर्मचारी अशोक तोडमल व मनीषा बनसोडे, ग्रामस्थ आकाश पवार, व विक्रम गाढवे व इतर ग्रामस्थांनी स्वागत केले.





हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmailD- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# टाकळीभान येथील बंधारे कोरडे ठाकच....

## पालकमंत्री व लोकप्रतिनिधी यांनी लक्ष घालण्याची मागणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील दरवर्षी उन्हाळ्यामधील आवर्तनामध्ये भरण्यात येणारे ओढ्यावरील बंधारे कोरडे ठाकच असून याबाबत पालकमंत्री व लोकप्रतिनिधी यांनी लक्ष घालण्याची मागणी येथील लाभधारक शेतकरी व ग्रामस्थांनी केली आहे. गेल्या एक महिन्यापासून टेल टॅंक (गोविंद सागर) मधून शेतीचे आवर्तन सुरू असताना येथील ओढ्यावरील बंधारे भरले गेले नाहीत. प्रत्येक वर्षी त्या त्या लोकप्रतिनिधींनी काळजी घेऊन ते भरले आहेत.

उलट यावर्षी उन्हाची तीव्रता जास्त असताना टाकळीभान घूमनदेव रोड लगत ओढ्यावरील बंधाऱ्या लगतच्या शेतकऱ्यांची पाण्याची पातळी खालावली असून विहीर, बोअरवेल यांचे पाणी अतिशय कमी झाले आहे, त्यामुळे या लाभधारक क्षेत्रातील पिके यांना पाण्याचा फटका बसला असून पाणी पातळी कमी झाल्याने पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना तीव्र उन्हात भटकंतीची वेळ आली आहे. दरवर्षी उन्हाळ्यामध्ये येथील बंधारे भरल्याने पाणी पातळी टिकून उन्हाळ्याचा सीजन निघत होता. यावर्षी येथील ओढ्यावरील बंधारे भरण्यासंदर्भात अनेक वेळा शेतकरी नागरिकांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना बंधारे भरून घेण्याची मागणी केली होती.

त्यांनी फक्त आश्वासन देत कार्यवाही केली नाही. व जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. या उलट इतर तालुक्यातील बंधारे भरल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यामुळे येथील शेतकऱ्यावर अन्याय का असा प्रश्नही शेतकऱ्यांना पडला आहे. शेतीच्या आवर्तनातून बंधारे भरले न गेल्यामुळे येथील नागरिक व शेतकऱ्यांसमोर मोठे पाण्याचे संकट उभे राहिले असून या कामी जिल्ह्याचे पालकमंत्री जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, येथील लोकप्रतिनिधी आ. हेमंत ओगले यांनी जलसंपदा विभागाला सूचना करून येथील बंधारे भरून घ्यावेत अशी मागणी येथील शेतकरी व नागरिकांनी केली आहे.

> टाकळीभान ओढ्यावरील बंधारे दरवर्षी भरण्यात येतात परंतु यावर्षी मागणी करूनही जलसंपदा विभागाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. यावर्षीच्या तीव्र उन्हामुळे तसेच ओढ्यावरील बंधारे न भरले गेल्यामुळे टाकळीभान घूमनदेव रोडच्या ओढ्यावरील बंधाऱ्यात लगतच्या लाभधारक शेतकऱ्यांची पाणी पातळी खालावली असून ओढ्यावरील बंधाऱ्यांलगतच्या शेतकऱ्यांचे विहीर बोरवेलचे पाणी अतिशय कमी झाले आहे. त्यामुळे पिके वाचवणे शेतकऱ्यांना मुश्किलीचे होत असून पाण्याने तळ गाठल्याने पिण्याच्या पाण्याचे हाल होत असून तीव्र उन्हामध्ये येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे टेल टॅंक (गोविंद सागर) मधून येथील सर्व बंधारे भरण्यात यावे व या कामी अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री व जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे व श्रीरामपूरचे लोकप्रतिनिधी आ. हेमंत ओगले यांनी सदर बंधारे भरण्यासंदर्भात सूचना कराव्या अशी मागणी येथील शेतकरी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच इतर अकोले, संगमनेर, राहता, तालुक्यातील भंडारदरा लाभक्षेत्रावर अवलंबून असणारे सर्व बंधारे भरण्यात येतात, श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान सारख्या मोठ्या गावातील बंधारे भरण्यात काय अडचण येते असा प्रश्न ही शेतकऱ्यांना पडला आहे.
>
> **शिवाजीराव शिंदे, संचालक, कारेगाव भाग अशोक कारखाना**

## द•ख•ल

### आंतरराष्ट्रीय लोककला स्पर्धेसाठी अमृतवाहिनीच्या त्रिशा कदमची निवड



**संगमनेर** : पुणे येथे अखिल लोककला सांस्कृतिक संस्थेने आयोजित केलेल्या भारत महोत्सव २०२६ या राष्ट्रीय स्तरावरील कला स्पर्धेत अमृतवाहिनी इंटरनॅशनल स्कूल मधील इयत्ता तिसरी मध्ये शिकणारी विद्यार्थिनी त्रिशा सचिन कदम हिने लोकनृत्य स्पर्धा प्रकारात प्रथम क्रमांक पटकावून संगमनेरचे नाव उज्ज्वल केले. त्रिशाच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल व्हिएतनाममध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कला महोत्सवामध्ये लोकनृत्य स्पर्धे साठी निवड करण्यात आली. संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयूताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी मध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात असते. त्रिशाने बालरंगभूमी परिषद, मुंबई- जल्लोष लोककलेचा नृत्यस्पर्धे त प्रथम क्रमांक, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, संगमनेर शाखेच्यावतीने आयोजित लोकनृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक, टीम ड्रीम लांचर नाशिकच्या राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

### त्रिदिनात्मक राम नाम जप सोहळ्याची आज सांगता

**माळवाडगांव** : विश्व माता गोरक्षा व जगावर असलेले युध्दाचे सावट दूर होऊन जगभर शांती प्रस्थापित व्हावी.या शुध्द हेतूने सदगुरू नारायणगिरी महाराज यांच्या आशीर्वादाने महंत रामगिरी महाराज यांच्या प्रेरणेने संदिपान महाराज यांच्या उपस्थितीत गोदाकाठावरील बाजाठान ( ता.वैजापूर) येथील रामदरबार आश्रमात प्रेममूर्ती हरिशरण महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिदिनात्मक अखंड राम नाम जप सोहळ्याची सांगता आज गुरूवार दि.२८ रोजी सकाळी ९ ते ११ वाजता सेवानाथजी महाराज, गोरक्षनाथ आश्रम खोकर यांच्या सांगता किर्तनाने होणार आहे. मंगळवार दि.२६ पासून सुरू असलेल्या त्रिदिनात्मक राम नाम जप सोहळयास प्रारंभ झाला. या राम नाम जप सोहळ्यास शेकडो महिला पुरुष भक्तांनी सहभाग घेतला आहे. पहिल्या दिवशी दुपारी शुक्लेश्वर शिंदे ऊंदीरवाडी तर सायंकाळी समस्त उंडे परिवार भोजडे चौकी यांनी अन्नदान केले. दि.२७ एकादशीचे दिवशी सरपंच अनिल कंसाने, बाळासाहेब कंसाने, देवीदास कणसे,विजय ढंगारे,अशोक शिंदे मांजरीकर, सायंकाळी आप्पासाहेब मुंढे पानव खुर्द यांनी अन्नदान केले. सांगता किर्तनानंतर गोविंद जाधव भायखेडा यांची महाप्रसाद पगंत होईल.

## तेलकुडगाव येथील महिला अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या किर्तनाने सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील तेलकुडगाव येथे महिला सुसंस्कार अभियानांतर्गत भव्य स्त्री जागृती कीर्तन महोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त आयोजित महिला अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या किर्तनाने उत्साहात सांगता झाली.

भगवान नागनाथाच्या कृपाशीर्वादाने तसेच जनता जनार्दनाच्या सहकार्याने हा धार्मिक व सांस्कृतिक सोहळा उत्साहात पार पडला. महंत गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज, गुरुवर्य बन्सी महाराज तांबे, देविदास महाराज म्हस्के तसेच रामायणाचार्य हनुमंतजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने हा सोहळा पार पडला. हभप नवनाथ महाराज घाडगे, श्रीधर महाराज घाडगे, अमोल महाराज घाडगे, महेश महाराज घाडगे व धनुर्धर महाराज घाडगे यांच्या प्रेरणेने तसेच सुप्रसिद्ध कीर्तनकार जयाताई महाराज घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हभप भागवताचार्य जयाताई महाराज घाडगे यांच्या काल्याच्या किर्तनाने या सोहळ्याची सांगता झाली.

मंगळवारी सकाळी ७ ते ८ या वेळेत दिंडी प्रदक्षिणेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रत्नमालाताई विठ्ठलराव लंघे यांनी उपस्थित राहून महिलांना मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले. हभप नवनाथ महाराज घाडगे व हभप अमोल महाराज घाडगे यांनी सर्व महिला भगिनींचे आभार मानले. गावातील सर्व भजनी मंडळ यांनी चांगले सहकार्य केले. सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, सर्व ग्रामस्थ, महिला मंडळ, सोसायटी सर्व पदाधिकारी सर्वजण मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सप्ताहामध्ये हभप जयाताईंनी एक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवला होता.

तसेच सेवानिवृत्त अंगणवाडी सेविकेचाही सत्कार यावेळी करण्यात आला. काल्याच्या कीर्तनामध्ये सर्व उपस्थित महिला भगिनींनी पुरणपोळी व धोंडा जेवण दिले. त्याचप्रमाणे आमटी भात आणि गुळवणी या महाप्रसादाचे अनिता कचरू गायकवाड, ज्योती कुशीनाथ गायकवाड, मंगल बबनतात्या म्हस्के, चंद्रकला हरिभाऊ गटकळ, रुक्मिणी दत्तात्रय घोडेचोर यांनी महाप्रसादाचे नियोजन केले.

## लोहारवाडीत दारूबंदीसाठी महिलांचा एल्गार

### पोलिसांकडून कारवाईचे आश्वासन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चांदा** : लोहारवाडी येथे अवैध दारूविक्रीच्या विरोधात महिलांनी आक्रमक भूमिका घेत थेट हनुमान मंदिरासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले. गावात सुरू असलेल्या अवैध दारूविक्रीमुळे संसार उद्ध्वस्त होत असून, दारूच्या व्यसनामुळे महिलांवर अत्याचार वाढल्याचा आरोप करत महिलांनी संताप व्यक्त केला.

गावातील महिलांनी सांगितले की, दारूच्या आहारी गेलेले पुरुष घरी येऊन पत्नी व कुटुंबीयांना मारहाण करतात. अनेकदा दारू पिऊन वाहन चालवल्याने अपघात होतात आणि त्याचा आर्थिक भार कुटुंबावर पडतो. हलाखीच्या परिस्थितीत दिवसभर कष्ट करून संसार चालवायचा आणि रात्री दारू पिऊन होणारा त्रास सहन करायचा, अशी वेळ आमच्यावर आली असल्याची व्यथा महिलांनी मांडली. गावातील आरो फिल्टर मशिन व मंदिर परिसरालगतच अवैध दारूविक्री सुरू असल्याचा आरोप महिलांनी केला.

पाणी आणण्यासाठी गेलेले पुरुष तिथेच दारू पिऊन घरी येतात. त्यानंतर घरात आरडाओरडा, शिवीगाळ व मारहाण केली जाते. दुसऱ्या दिवशी विचारणा केली तर काहीच आठवत नसल्याचे सांगितले जाते, असे महिलांनी सांगितले. दारूमुळे गावातील अनेक युवकांचे प्राण गेल्याचा गंभीर आरोपही महिलांनी केला.

त्यामुळे अनेक महिलांचे संसार उद्ध्वस्त झाले असून, गावात पूर्णतः दारूबंदी लागू करावी, अशी ठाम मागणी आंदोलनकर्त्या महिलांनी केली. आज काही झाले तरी आम्ही मागे हटणार नाही, असा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला. दरम्यान, आंदोलनाची माहिती मिळताच सोनई पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली.

महिलांशी चर्चा करत त्यांनी अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. पोलीस प्रशासन तुमच्या पाठीशी आहे. गावातील अवैध दारूविक्री बंद करण्यासाठी आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे आश्वासन अनिल मोरे यांनी दिल्यानंतर महिलांनी आंदोलन स्थगित केले.

## गगनगिरी महाराज सप्तास्थळाची पालकमंत्र्यांकडून पाहणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील गुंजाळवाडी येथे होणाऱ्या स्वामी गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह व भव्य कृषी महोत्सवाच्या पूर्वतयारीची पालकमंत्री राधाकृष्ण विखे व आ. अमोल खताळ यांनी भेट देत पाहणी करत सत्तास्थळ येणाऱ्या भाविकांची व्यवस्था आणि कृषी प्रदर्शन स्टॉलच्या नियोजनाचा धावता आढावा घेतला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे व आ. अमोल खताळ हे जवळे कडलग येथे कार्यक्रमानिमित्त आले होते. कार्यक्रम संपल्यानंतर त्यांनी गुंजाळवाडी येथे अधिक मासानिमित्त दि ८ जून ते १५ जून २०२६ या कालावधीत होत असणाऱ्या प.पु. गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहस्थळी भेट दिली. त्यावेळी सप्ताह कमिटीचे अध्यक्ष दिलीप शिंदे तसेच एस. आर. थोरात अध्यक्ष समूहाचे प्रमुख आबासाहेब थोरात यांनी या सप्ताहसाठी येणाऱ्या भाविकांची, निवास व्यवस्था, महा प्रसाद, वाहतूक नियोजन, कृषी प्रदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमांची तसेच कृषी महोत्सवाच्या तयारीची सविस्तर माहिती दिली. यावेळी सप्ताह कमिटीच्या वतीने पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे आणि आ. अमोल खताळ यांचा सन्मान करण्यात आला. सप्ताहस्थळी धार्मिक वातावरण निर्माण झाले असून गावकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. यावेळी बन्सी महाराज गुंजाळ, महायुतीचे संदीप घुगे, जनार्दन आहेर, एस आर थोरात, दूध उद्योग समूहाचे पृथ्वीराज थोरात, पोपट गुंजाळ, रोहिदास गुंजाळ, युवराज गुंजाळ यांच्यासह गगनगिरी महाराज भक्त मंडळ उपस्थित होते.

## ग्रीनफिल्ड महामार्गग्रस्त शेतकऱ्यांसाठी बाळासाहेब थोरातांचा प्रयत्न



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींना अत्यल्प मोबदला दिल्याने संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. बाधित शेतकऱ्यांना योग्य व वाढीव मोबदला मिळावा, यासाठी सर्वपक्षीय शेतकरी शिष्टमंडळाने माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांची भेट घेतली. यावेळी थोरात यांनी थेट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना दूरध्वनी करून शेतकऱ्यांच्या मागण्या मांडल्या. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्यात झालेल्या बैठकीत तळेगाव परिसरातील विविध गावांतील शेतकरी उपस्थित होते. यामध्ये माजी उपसभापती अविनाश सोनवणे, संचालक संपतराव गोडगे, हौशीराम सोनवणे, डॉ. संदीप गोर्डे, किसनराव सुपेकर, विलास सोनवणे यांच्यासह अनेक शेतकरी सहभागी झाले होते. सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील १०८३.८८ हेक्टर जमीन संपादित केली जात आहे.

संगमनेर तालुक्यातील चिंचोली गुरव, तळेगाव, अजमपूर, आरामपूर, वरझडी बुद्रुक, वरझडी खुर्द, हसनाबाद, लोहारे, कासारे, सादतपूर आणि चिंचपूर या गावांतील मोठ्या प्रमाणातील जमीन या प्रकल्पात संपादित झाली आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या जमिनींसाठी प्रतिएकर केवळ सात ते दहा लाख रुपये इतकाच मोबदला देण्यात आला आहे. परिसरात निळवंडे धरणाचे पाणी उपलब्ध झाल्यानंतर अनेक शेतकऱ्यांनी डाळिंब, भाजीपाला व अन्य नगदी पिकांची बागायती शेती विकसित केली आहे. त्यामुळे बाजारभावाच्या तुलनेत देण्यात आलेला मोबदला अत्यंत कमी असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

यावेळी बाळासाहेब थोरात यांनी, शेतकरी स्वतः ची जमीन विकासासाठी देत आहे. त्यामुळे त्याला रास्त मोबदला मिळालाच पाहिजे. काँग्रेस आघाडी सरकारच्या काळातही संपादित जमिनींना चांगला भाव देण्याचा प्रयत्न झाला होता, असे सांगितले. यानंतर त्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करून दुष्काळी भागातील शेतकऱ्यांची परिस्थिती मांडली. बाधित जमिनींचे फेरमूल्यांकन करून शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याची मागणी त्यांनी केली. गडकरी यांनीही या मागणीबाबत सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती बैठकीनंतर देण्यात आली.

## आपले संस्कार कधी ही विसरू नका : गोवत्स राधाकृष्णजी महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : जीवनामध्ये अहंकार नसून प्रेम, भक्ती आणि संस्कारांचा रस असला पाहिजे. शिक्षण घ्या, मोठ्या पदव्या मिळवा; मात्र भारतीय संस्कृती आणि संस्कार विसरू नका.धर्मामुळेच समाजाला एकत्र आणण्याचे मोठे कार्य करत असतो असे प्रतिपादन कथा प्रवक्ते गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांनी श्री क्षेत्र देवगड येथे सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथा सोहळ्याच्या सहाव्या पुष्पात केले. नेवासा तालुक्यातील श्री गुरुदेव दत्त पीठ श्री क्षेत्र देवगड येथे त्रैवार्षिक पुरुषोत्तम मासानिमित्त श्रीमद भागवत कथा, श्री दत्त लक्ष्मी नारायण याग व कीर्तन असा श्री विठ्ठल भक्तिरस महोत्सव सुरू असून, कथेच्या सहाव्या दिवशी पंचक्रोशीसह दूरदूरच्या भागांतून भाविकांनी मोठी गर्दी केली होती.



नेवासा तालुक्यातील देवगड येथे सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथेत भाविकांना मार्गदर्शन करताना प्रवक्ते गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज समवेत उपस्थित भाविक **(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)**

कथा प्रसंगी बोलताना गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज म्हणाले की, अतिथी देवो भव ही भारत देशाची संस्कृती आहे. शहरांपेक्षा ग्रामीण भागात कथा-कीर्तन करताना अधिक आत्मीयता आणि प्रसन्नता अनुभवायला मिळते. गावागावातील एकता टिकवून ठेवणे ही काळाची गरज आहे. समाजात वाद निर्माण होतील अशी वक्तव्ये करू नयेत. समाजाला एकत्र आणण्याचे कार्य धर्म करत असतो. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या कार्याचा गौरव करत वारकरी संप्रदायाचे महत्त्व विशद केले. संतांनी समाजाला भक्ती, सेवा, सदाचार आणि मानवतेचा मार्ग दाखविला. संत ज्ञानेश्वर महाराजांनी 'पसायदान' मधून विश्वकल्याण, सद्भावना आणि समाजातील ऐक्याचा संदेश दिला. संतांच्या विचारांमुळेच महाराष्ट्राची आध्यात्मिक ओळख निर्माण झाली, असेही त्यांनी सांगितले.

कथा प्रसंगी गोवत्स राधाकृष्ण महाराज यांनी भगवान श्रीकृष्ण, कंस तसेच गोप-गोपीकांच्या प्रसंगांचे विवेचन केले. श्रीकृष्ण भक्तीतील प्रेमभाव तसेच अध्यात्मातील समर्पण यांचे सुंदर निरूपण करत त्यांनी महत्त्व भाविकांना पटवून दिले. श्री क्षेत्र देवगड येथे कथा करताना मिळणारा भक्तिरस आणि आत्मीयता अन्यत्र क्वचितच अनुभवायला मिळते. येथे येणाऱ्या भाविकांची श्रद्धा आणि भक्ती पाहून मन प्रसन्न होते, अशा शब्दांत त्यांनी भावना व्यक्त केल्या.

यावेळी त्यांनी गोविंद राधे, गोपाल राधे... या भक्तिगीताचे संकीर्तन केले. विविध वाद्यांच्या साथीने संपूर्ण परिसर भक्तिरसात तल्लीन झाला होता. दरम्यान, कथा सोहळ्यानिमित्त भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच गुरुदास भास्करगिरी महाराज विद्यालय, जळके खुर्द येथील विद्यार्थी दररोज कथेच्या शेवटी वारकरी वेशभूषेत भागवत आरती सादर करत असून भाविकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

कथा प्रसंगी गुरुवर्य महंत भास्करगिरी महाराज, स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज, ज्ञानेश्वर मंदिर देवस्थान नेवासा येथील महंत देविदास महाराज म्हस्के, अनंत विभूषित महाराज, अमरीशजी महाराज, नारायणगिरी महाराज, शिवानंदगिरी महाराज तसेच कडूभाऊ कर्डीले आदी उपस्थित होते.

## पुणतांबा येथे उपसरपंचपदी कोणाची वर्णी लागणार ?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पुणतांबा** : पुणतांबा -रास्तापूर ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी कोणाची वर्णी लागणार याकडे पुणतांबा ग्रामस्थांचे लक्ष लागून आहे उपसरपंच निकिता जाधव यांनी वैयक्तीक कारणामुळे नुकताच राजीनामा सुपूर्द केला आहे. पुणतांबा - रास्तापूर गुप ग्रामपंचायती निवडणूक ५ नों०हे बंर २०२ ३ रोजी संपन्न झाली होती व ६ नोव्हेंबर रोजी निवडणूक निकाल लागला होता ग्रामपंचायत सत्तेत परिवर्तन होऊन पुणतांबा विकास आघाडीच्या ताब्यात ग्रामपंचायत आली होती डिसेंबर २०२३मध्ये उपसरपंच म्हणून निकिता जाधव यांनी पदभार घेतला होता व दोन वर्षापेक्षा जास्त काळ हे पद भूषविले होते. त्यांचा राजीनामा हा सत्तारूढ गटातील अंर्तगत बाब आहे.

ह्यामुळे फार मोठी राजकीय गणिते बदलतील किंवा आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीवर काही प्रभाव पडेल अशी स्थिती नाही कायदेशीर बाबी पूर्ण झाल्यावर नवीन उपसरपंच निवडीबाबद रितसर प्रक्रिया येत्या काही दिवसात पूर्ण केली जाण्याची शक्यता आहे उपसरपंच निवडीबाबद आता तरी कोणी लॉबींग करत आहे, अशी चर्चा नाही सत्तारूढ गटातील नेते याबाबदनिर्णय घेण्यास सक्षम आहेत. उपसरपंचपदी परत एखाद्या महिलेला संधी दिली जाणार याकडे लक्ष आहे. पुणतांबा ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती फारशी सक्षम नाही. पाणी व घरपट्टी पोटी ग्रामस्थाकडून पंचायतीला कोट्यावधी रुपयांचे येणे आहे. वसुलीचे काम अवघड आहे दोन्ही पाणी पुरवठा योजनांचा बट्याबोळ कशामुळे झाला हे ग्रामस्थांना पाणीपुरवठा योजनेचे काम सुरु झाले व पहिल्याच पावसाळ्यात साठवणूक तलावाची दगडी पिंचीग पडून सिमेंटचे बिम वाकले होते. तेव्हांच लक्षात आले होते त्यामुळे भविष्यात पुणतांबेकरांना पाणीटंचाईला तोंड द्यावेच लागणार आहे तसेच ग्रामपंचायतीचा कारभार सुध्दा चालविणे फारसे सोपे नाही कारण ग्रामस्थांच्या अपेक्षा दिवसेंदिवस वाढत आहे.

## पान १ वरुन

# जगासमोर अन्न संकटाचा धोका

मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे या मार्गातील अडथळ्याचा परिणाम थेट इंधन दरांवर आणि त्यानंतर अन्नधान्याच्या किंमतींवर होत आहे. या संकटामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढत आहेत. परिणामी शेतीसाठी लागणाऱ्या खतांचे आणि बियाण्यांचे दरही वाढले आहेत. खतांच्या वाढत्या

किमतीमुळे अनेक शेतकरी त्यांचा वापर कमी करण्याची शक्यता आहे. यामुळे उत्पादनात घट होऊ शकते आणि बाजारात धान्याचा पुरवठा कमी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पुरवठा घटल्याने अन्नधान्य महाग होईल आणि महागाई आणखी वाढेल, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

यावर्षी एल निनो हवामान परिणामामुळे अनेक देशांमध्ये दुष्काळाची शक्यता वर्तवली जात आहे. आधीच इंधन आणि वाहतूक खर्च वाढल्यामुळे अन्नधान्याच्या किंमती वाढत असताना दुष्काळामुळे परिस्थिती अधिक बिकट होऊ शकते.

एफएओच्या अहवालानुसार, एप्रिल महिन्यात जागतिक अन्न किंमत निर्देशांक सलग तिसऱ्या महिन्यात वाढला. यामागे मध्य पूर्वेतील संघर्ष आणि वाहतूक खर्चातील वाढ हे प्रमुख कारण असल्याचे सांगितले जात आहे.

तज्ज्ञांच्या मते, होर्मुझ सामुद्रधुनीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी तातडीने पर्यायी मार्गांचा वापर सुरू करणे आवश्यक आहे. विशेषतः सौदी अरेबिया आणि लाल समुद्र मार्गाचा वापर वाढवण्यावर भर देण्यात आला आहे.

याशिवाय धान्य आणि खतांच्या निर्यातीवर निर्बंध लावू नयेत, असे आवाहनही करण्यात आले आहे. कारण निर्यातबंदीमुळे जागतिक बाजारपेठेत आणखी तुटवडा निर्माण होऊ शकतो.

एफएओने सरकारांना शेतकरी आणि गरीब कुटुंबांसाठी विशेष मदत योजना राबवण्याचा सल्ला दिला आहे. डिजिटल माध्यमांद्वारे थेट आर्थिक मदत देणे, कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देणे आणि कर्जफेडीसाठी सवलतीचा कालावधी देणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी म्हटले आहे. याशिवाय कमी खत लागणाऱ्या शेती पद्धतींचा अवलंब करण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. धान्य आणि कडधान्यांची मिश्र पिके घेणे, नैसर्गिक शेती पद्धती आणि पाण्याची बचत करणाऱ्या तंत्रांचा वापर करण्यावर भर देण्यात आला आहे.

सौर ऊर्जा आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानावर भर

दीर्घकालीन उपाय म्हणून शेती क्षेत्रात सौर ऊर्जा, इलेक्ट्रिक पंप आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्याची गरज एफएओने व्यक्त केली आहे. ड्रोन तंत्रज्ञान, माती परीक्षण आणि अचूक शेती पद्धतींचा वापर केल्यास उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादनक्षमता वाढू शकते.

..........

## दरोड्याच्या तयारीतील पुण्याच्या मेहंदळे टोळीच्या मुस्क्या आवळल्या

मांडळकर (वय १९) आणि समर्थ राजेंद्र दुधभाते (वय १८, सर्व रा. कोंढवा, पुणे) या चौघांना ताब्यात घेतले. तर त्यांचा एक साथीदार आकाश संजय पवार (रा. भिंगार, अहिल्यानगर) हा पोलिसांना चकवा देऊन पळून जाण्यात यशस्वी झाला.

पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींची अंगझडती घेतली असता, विराट मेहंदळे याच्याकडे ४० हजार रुपये किमतीचे गावठी पिस्तुल आणि जिवंत काडतूस सापडले. मुस्ताक शेख याच्याकडे धारदार कोयता, समर्थ दुधभाते याच्याकडे स्टीलचा बटनचा चाकू आणि समर्थ मांडळकर याच्याकडे लाल मिरचीची पूड मिळून आली. तसेच त्यांच्याकडे वेगवेगळ्या कंपन्यांचे चार महागडे म ोबाईल फोन देखील जप्त करण्यात आले आहेत. हे सर्व आरोपी घातक हत्यारांसह कोठेतरी मोठा दरोडा टाकण्याच्या पूर्वतयारीत असल्याचे तपासात समोर आले आहे.

याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार सुनील विनायक पवार यांनी कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि आर्म ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सहाय्यक निरीक्षक मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार गारुडकर या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

....................

## हॉटेलच्या कामावरून आचाऱ्याचा खून, तीन परप्रांतीय अटक

(ता.श्रीगोंदा) शिवारात जेरबंद करण्यात यश मिळवले. हुसेन दस्तगीर पठाण यांच्या फिर्यादीवरून राज हरीनाम गुप्ता, दुखहरण तिरथराज गौतम, मनोज सबुरीलाल गौतम या तिघांवर बीएनएस कलम १०३ (१), ३(५) प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर घटनेचा पुढील अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रदीप बोऱ्हाडे करीत आहे.

खुनाची माहिती, बघ्यांची गर्दी आणि अवघ्या एका तासात खुनाचा उलगडा – बुधवारी सकाळी हॉटेल गौरव येथे खून झाला असल्याची माहिती कर्जत शहर आणि परिसरात समजताच घटनास्थळी मोठी गर्दी जमली होती. अनेकांनी घटनेबाबत तर्क-वितर्क लावत दबक्या आवाजात चर्चा सुरू केली. मात्र कर्जत पोलीस दलाने मिळालेल्या माहितीच्या आधारे अवघ्या एकाच तासात खुनाचा उलगडा करीत तीन जणांना ताब्यात घेत अटक केली.

# कृषीरंग अंतर्गत पुरंदर कला मंचा सांस्कृतिक कार्यक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** भक्तीगीते , शेतकरी गीते, प्रेमगीते, कविता, देश भक्तीपर गाणी, हिंदी मराठी चित्रपटातील गाणी, निळू फुले यांच्या आवाजातील मिमिक्री अशा विविधरंगीं सांस्कृतिक कार्यक्रमाचे सुंदर सादरीकरण करून पुरंदर तालुक्यातील स्थानिक कलाकार मंडळींनी रसिकांच्या टाळ्या मिळवल्या.सासवड येथें आयोजित पुरंदर एक्स्पो प्रदर्शनात पुरंदर कलामंचच्या कलाकारांनी कृषीरंग अंतर्गत करावके प्रकारातील हा देखणा कार्यक्रम सादर केला आरोही मोरे या छोटया मुलीच्या ‘‘, तुझं मागतो मी आता ‘‘ या गीताने कार्यक्रमांची सुरवात झाली.मेरे देश कीं धरती, मळ्याच्या मळ्यामधी, काठीन घोंगड घेऊ द्या कीं र, विठू माऊली तु, काय सांगू राणी मला गावं सुटना अशा एका पेक्षा एक सुंदर गाण्यांचे यावेळी सादरीकरण करण्यात आले. रणजित गायकवाड याच्या ’तेरी मिट्टीमे मिल जावा या वेगळ्या स्वरूपातील गाण्याने रसिकांच्या बराच वेळ टाळ्या घेतल्या. शिवाजी झुरंगे यांच्या निळू फुले यांच्या आवाजातील मिमिक्रीने कार्यक्रमाची रंगत वाढली. जय जय महाराष्ट्र माझा या गीताने कार्यक्रमाची सांगता झालीपुरंदर कलामंचचे संजय काटकर, राम दहिवाळ, शरद पाडसे, शुभांगी महामुनी, नाना गिरमे,सतीश वाघोले, शिल्पा हेंद्रे, सुवर्णा होले, बापू गिरमे, मुस्कान काझी बाळासो कुंजीर आदींनी या वेळी गीते सादर केली. स्नेहा शेवाळे व सचिन गोंधळी यांनी सुंदर सूत्रसंचालनं केले संभाजी ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड, ग्रामीण संस्थेच्या राजवर्धिनी जगताप, उद्योजक मालोजीराजे जाचक, सविता मोगल पाटील, जिल्हा परिषद सदस्य हरिभाऊ लोळे, पंचायत समिती सदस्य सायली शिंदे, प्रदीपअण्णा पोमण, संदीप फडतरे, माऊली गिरमे, प्रकाश पवार, शरद चवरे, बंटी जगताप, भय्या महाजन, देविदास कामठे, सुनील हेंद्रे यांसह मोठया संख्येने रसिक वर्ग यावेळी उपस्थित होता.




महाराष्ट्र गीत सादर करताना कलामंचचे कलाकार

# आळंदीत ‘श्रीरामकथा मानस पसायदान’ सोहळ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद


**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** चैतन्य गोशाळा ट्रस्ट, यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘श्रीरामकथा मानस पसायदान’ या नऊ दिवसीय आध्यात्मिक सोहळ्याला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. फुटवाले धर्मशाळा, आळंदी येथे सुरू असलेल्या या कार्यक्रमात दररोज मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहत असून परिसर भक्तिरसाने भारावून गेला आहे.

### रवींद्र पाठक यांच्या भावपूर्ण निरूपणाने भक्तिमय वातावरण

कार्यक्रमामध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पवित्र पसायदानाचे सामूहिक पठण करण्यात येत असून, त्यानंतर कथा निरुपणकार श्री. रवींद्र पाठक यांच्या ओजस्वी व भावपूर्ण वाणीतील श्रीरामकथेचे निरूपण भाविकांना मंत्रमुग्ध करत आहे. रामायणातील विविध प्रसंगांचेमनातला आध्यात्मिक, सामाजिक आणि संस्कारमूल्यांशी जोडलेले विवेचन उपस्थितांच्या मनाला स्पर्शून जात आहे.

विशेष म्हणजे, श्रीरामकथेबरोबरच माऊलींच्या पसायदानाचेही सखोल निरूपण करण्यात येत आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांनी विश्वकल्याणासाठी व्यक्त केलेल्या पसायदानातील संदेश, मानवतेचे तत्त्वज्ञान, समाजातील सद्भावना आणि भक्तीमार्गाचे महत्त्व यांचे अत्यंत समर्पक विवेचन रवींद्र पाठक करत असल्याने भाविकांना अध्यात्मिक आनंदाची अनुभूती मिळत आहे.सद्गुरु श्री. ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर यांच्या कृपाआशीर्वादाने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात नामस्मरण, भक्ती आणि अध्यात्माचा सुंदर संगम अनुभवायला मिळत आहे. सकाळ व सायंकाळच्या सत्रांमध्ये भाविकांची मोठी उपस्थिती पाहायला मिळत असून संपूर्ण परिसर रामनामाच्या गजराने दुमदुमून जात आहे.हा आध्यात्मिक सोहळा दि. ३१ मे २०२६ पर्यंत सुरू राहणार असून, अधिकाधिक भाविकांनी उपस्थित राहून आध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या संकेत वाघमारे यांनी केले आहे.




# कश्यपी धरणात बुडून संगमनेरच्या दांपत्यासह चौघांचा मृत्यू

## महिलेच्या प्रसंगावधानामुळे दोन वर्षीय बालिका बचावली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** कश्यपी धरण येथे फिरण्यासाठी गेलेल्या संगमनेर तालुक्यातील पिंपरणे येथील दांपत्यासह चार जणांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या दुर्घटनेमुळे पिंपरणे गावावर शोककळा पसरली आहे.

मृतांमध्ये सचिन कैलास ठोंबरे (वय ३२), त्यांची गर्भवती पत्नी रोहिणी ठोंबरे, तसेच शेजारी राहणारे केतन अनिल पवार (वय १६) व कौशल्य अनिल पवार (वय १४) यांचा समावेश आहे. या दुर्घटनेत ठोंबरे दांपत्याची दोन वर्षांची चिमुकली बालिका मात्र थोडक्यात बचावली.

घटनास्थळी उपस्थित असलेल्या संगीता घाडगे यांनी प्रसंगावधान राखत बालिकेचा जीव वाचवला. त्यांनी सांगितले की, एक लहान मुलगी ‘मम्मी-पप्पा’ म्हणत पाण्याकडे बोट दाखवत होती. संशय आल्याने आम्ही तात्काळ धरणाकडे धावलो आणि बालिकेला सुरक्षित ठिकाणी आणले.

पाण्याजवळ पडलेल्या चपला पाहून कोणीतरी बुडाल्याचा संशय आल्याने परिसरातील नागरिकांनी शोधकार्य सुरू केले. स्थानिक तरुणांनी खोल पाण्यात धाडसी उड्या घेत शोधमोहीम राबवली. काही वेळाने चौघांनाही बाहेर काढण्यात आले; मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता.

धरणालगतच्या गावात कुस्ती स्पर्धा सुरू असल्याने परिसरात मोठी गर्दी होती. त्याच दरम्यान ही दुर्घटना घडली. मृत सचिन ठोंबरे हे सिव्हिल इंजिनियर असून मूळचे संगमनेर तालुक्यातील पिंपरणे येथील रहिवासी होते. गेल्या दोन वर्षांपासून ते नाशिकमधील म्हसरूळ-मखमलाबाद नाका परिसरात वास्तव्यास होते. सुट्टीचा दिवस असल्याने ठोंबरे व पवार कुटुंब फिरण्यासाठी कश्यपी धरण परिसरात गेले होते.

जीवन बोर्से यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही कुटुंबे एकत्र फिरण्यासाठी आली होती. घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# नुकसानीचे पंचनामे करण्याचे आ. खताळ यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर :** संगमनेर तालुक्याच्या पठार भागा तील साकुर आणिपरिसरात जोरदार वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट होऊन मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली आहे. विजेचा धक्का बसून शेतकऱ्याचा मृत्यू झाला. पावसाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश आमदार अमोल खताळ यांनी अधिकाऱ्यांना दिले संगमनेर तालुक्याच्या पठार भागा तील साकुर जवळील हिवरगाव पठार शिवारातील गि-हेवाडी येथील दगड सोंडवाडीत वादळवारा आणि विजेचा कडकडाटासह पाऊस झाला या पावसाने परिसरातील शेतकऱ्यांचे पीक व घरांचे नुकसान झाले आहे. त्याच दरम्यान, हिवरगाव पठारातील गि-हेवाडी येथील मच्छिंद्र झुंबर दुधवडे हे मोटारसायकलवरून घरी जात असताना वीज अंगावर पडून त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. राज्यातील महायुती सरकार दुधवडे कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे सरकारच्या वतीने मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करु असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला

# भोकर सोसायटीच्या चेअरमनपदी विधाटे व्हा.चेअरमनपदी जगदाळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**भोकर :** तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्वाच्या असलेल्या भोकर विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी निलेश विधाटे तर, व्हा.चेअरमनपदी जेष्ठ संचालिका सिताबाई जगदाळे यांची बिनविरोध निवड झाली आहेत. काँग्रेसचे नगराध्यक्ष करण ससाणे व आमदार हेमंत ओगले यांच्या गटाच्या सोसायटी ताब्यात आहेत.यावेळी, निवडणुक निर्णय तथा अध्यासी अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक कार्यालयाचे सहकार अधिकारी रवींद्र जाधव यांनी काम पाहिले. भोकर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते माजी आमदार भानुदास मुरकूटे व काँग्रेसचे नगराध्यक्ष करण ससाणे व आमदार हेमंत ओगले यांच्यात तालुक्यात प्रथम युती झालेली आहेत. यात संचालक मंडळ निवडीनंतर स्वतंत्र गटाची स्थापना होवून असंघटीत बांधकाम कामगार नेते गणेश छल्लारे, महेश पटारे, बाळासाहेब विधाटे, कारभारी तागड तसेच तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष रामदास शिंदे, सागर शिंदे व बाबासाहेब तागड यांनी युती घडवत दोन ही गटाने रोटेशन पद्धतीने चेअरमन व व्हा. चेअरमन पद भूषविण्याचा निर्णय घेण्यात आला.त्यानुसार येथील प्रक्रिया पार पडली असून, या पंचवार्षिक मधील ही शेवटची निवड आहेत.





# अण्णा हजारे यांच्याकडे शेतकरी संरक्षण कायदा मसुदा सुपूर्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** शेतकरी संरक्षण कायदा संदर्भीय मसुदा तयार करण्यासाठी राज्यस्तरीय समिती कार्यरत होती या समितीचे अध्यक्ष व जेष्ठ कृषी वैज्ञानिक डॉक्टर मुकुंदराव गायकवाड सदस्य संभाजीनगर हायकोर्टचे नामवंत वकील अँड.अजितराव काळे, प्रदेशाध्यक्ष अशोक सब्बन, माजी कुलगुरू डॉक्टर अशोकराव ढगे यांनी अगोदर चार बैठका घेऊन या संदर्भात माहिती गोळा करून मसुदा तयार केला.तो तयार झालेला मसुदा थोर समाजसेवक अण्णा हजारे यांच्याकडे नुकताच सुपूर्त करण्यात आला



डॉक्टर मुकुंदराव गायकवाड यांनी जगातील सर्व देशांमध्ये शेतकरी संरक्षण कायद्याचा अभ्यास करून पाचशे पानाचा अहवाल तयार केला त्यानंतर त्यांनी त्यामधील निष्कर्ष व भारतातील शेतकऱ्यांसाठी योग्य अशी संदर्भ ४० पानात तयार केले.अमेरिका येथे इरमा, इसराइल येथे ॲग्रोस्को, नेदरलँड व इतर जागतिक कायद्यांचा अभ्यास केला जगामध्ये शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी विविध प्रकारचे कायदे आहेत तथापि भारतामध्ये शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात आत्महत्या होत असूनही कायदा नाही अशी या राज्यस्तरीय समितीचे निरीक्षण नोंदविण्यात आले

आज आपल्या देशामध्ये ग्राहक संरक्षण पत्रकार संरक्षण डॉक्टर दवाखाना संरक्षण इत्यादी प्रकारचे संरक्षण कायदे आहेत वन्य प्राण्यांना सुद्धा संरक्षण देणारा कायदा आहे तथापि शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी कायदा नाही अशी खंत मीटिंगमध्ये माजी कुलगुरू डॉ अशोकराव ढगे यांनी प्रस्तुत केली अँड. काळे यांनी कायद्याचा अभ्यास करून शेतकरी संरक्षण कायदा २०२६ मध्ये वेगवेगळे कलम उदाहरणार्थ जोखीम व्यवस्थापन अतिवृष्टी ढगफुटी दुष्काळ बिबट्याचा हल्ला साप चावणे यासारख्या गोष्टीवर कलमे तयार केली.अशोक सब्बन यांनी हा मसुदा देशाचे पंतप्रधान नितीआयोग, केंद्रीय कृषिमंत्री तसेच मुख्यमंत्री राज्य कृषी मंत्री व कृषी मूल्य आयोगाकडे सादर करावा अशी अशी विनंती थोर समाज सुधारक अण्णा हजारे यांना केली. हजारे यांनी मिटींगचे अध्यक्षस्थान भूषवून सखोल मार्गदर्शन केले.

शेतीच्या संदर्भात केंद्र व राज्य सरकारचे धोरण बदलणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादित करून हा मसुदा सर्व संबंधितांना पाठवण्या संदर्भात अश्वाषित केले यावप्रसंगी कार्लस साठे नितीन भालेराव व उपस्थित शेतकऱ्यांनी हा प्रश्न गांभीर्याने घेण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने शेतकरी संरक्षण कायदा आला पाहिजे यासाठी हा मसुदा तातडीने स्वीकारावा अशी सूचना व्यक्त केली.शेतकरी संरक्षण कायद्याचा मसुदा सर्वांगीण व परिपूर्ण असल्याचे राळेगण येथे झालेल्या मीटिंगमध्ये एकमत झाले

# ‘शिवाजी कोण होता?’ पुस्तकाचे सामुदायिक वाचन

## वादग्रस्त वक्तव्यांच्या पार्श्वभूमीवर वैचारिक उपक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे सामुदायिक वाचन करत छत्रपती शिवाजी महाराजांचा पुरोगामी, लोकाभिमुख आणि अभ्यासपूर्ण इतिहास जनमानसात पोहोचवण्याचा प्रयत्न श्रीरामपूर येथे करण्यात आला. शिवतीर्थ येथे लोकशाही, शिवप्रेमी आणि परिवर्तनवादी संघटनांच्या वतीने हा वैचारिक उपक्रम आयोजित करण्यात आला होता.



राज्यात अलीकडे छत्रपती शिवाजी महाराजांविषयी होत असलेल्या वादग्रस्त व अवमानकारक वक्तव्यांच्या पार्श्वभूमीवर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विशेषतः संजय गायकवाड यांनी पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांच्याविषयी केलेल्या वक्तव्यामुळे निर्माण झालेल्या वादानंतर या पुस्तकाच्या मूळ आशयाबाबत समाजात जागृती करण्याचा प्रयत्न आयोजकांनी केला.

यावेळी आयोजकांनी सांगितले की, राजकीय आणि वैचारिक स्वार्थातून अनेकदा छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास चुकीच्या पद्धतीने मांडला जातो. मात्र गोविंद पानसरे यांनी आपल्या पुस्तकातून शिवाजी महाराजांचा इतिहास सामाजिक, लोकाभिमुख आणि अभ्यासपूर्ण दृष्टीकोनातून मांडला आहे.

सामुदायिक वाचनादरम्यान उपस्थितांना पुस्तकातील विविध संदर्भ व विचार ऐकविण्यात आले. पुस्तकात कुठेही छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमानकारक किंवा एकेरी उल्लेख नसून त्यांच्या शौर्य, रयतेच्या हितासाठी घेतलेल्या निर्णयांची, सर्वधर्मसमभावाच्या धोरणांची आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराची प्रभावी मांडणी असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात इतिहासाकडे चिकित्सक दृष्टीकोनातून पाहण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. एखाद्या पुस्तकावर म व्यक्त करण्यापूर्वी ते वाचणे आणि त्याचा अभ्यास करणे आवश्यक असल्याचे मत उपस्थितांनी मांडले. समाजात अफवा आणि अपप्रचाराच्या आधारे मतप्रवाह तयार होत असल्याची खंतही व्यक्त करण्यात आली.

या उपक्रमात अरुण नाईक, कॉ. जीवन सुरुडे, अण्णासाहेब डावखर, प्राचार्य टी. ई. शेळके, श्रीकृष्ण बडाख, सुभाष गायकवाड, रमेश मकासरे, अशोक दिवे, संतोष मोकळ, अजय बत्तीसे, रामा काकडे यांच्यासह विविध संघटनांचे कार्यकर्ते व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आरोपांपेक्षा शिवरायांचा विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवा

या सामुदायिक वाचन उपक्रमातून इतिहास समजून घेण्यासाठी भावना आणि आरोपांपेक्षा अभ्यास, संवाद आणि वाचनाची गरज असल्याचा संदेश देण्यात आला. शिवरायांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी अशा वैचारिक उपक्रमांची आवश्यकता असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गुरवार दि .२८ मे २०२६

| मिलनम डे | | |
|---|---|---|
| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत |
| १२७ ४६० ५५० | ०-४ | १४९ २४८ २२० |
| जोड | ०७-३४--१८-२९-४५ | |

| कल्याण | | |
|---|---|---|
| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत |
| १६९ २६८ ३३० | ६-९ | १८० २८९ ३६० |
| जोड | ६१-२९-४३-७५-९८ | |

| मुंबैम (मेन) | | |
|---|---|---|
| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत |
| १४६ ४७० ११९ | १-० | १३६ २३५ ३३४ |
| जोड | १२-६०-४५-८९-०३ | |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 470 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |

# शैक्षणिक प्रवेशासाठी नेत्यांच्या दारी रांग

## कार्यालयीन खर्चातून 'लॉबिंग'चा आरोप

## इंजिनिअरिंग, वैद्यकीय प्रवेशांसाठी शिफारशींची लगबग

## फी कमी करण्यासाठीही राजकीय दबावाची चर्चा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू असताना अनेक शासकीय निमशासकी व खासगी संस्थांमधील काही अधिकारी, कर्मचारी राजकीय नेत्यांच्या दारी जाऊन शिफारशी मिळवण्यासाठी चकरा मारत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, आम्ही कोणाचे मिनधे नाही अशी भूमिका सार्वजनिकपणे मांडणारीच काही मंडळी आता भल्या पहाटेपासून नेत्यांच्या निवासस्थानी हजेरी लावत असल्याची चर्चा प्रशासन व राजकीय वर्तुळात रंगली आहे. प्रतिष्ठित शाळा, महाविद्यालये तसेच इंजिनिअरिंग आणि वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी काही पालक व संबंधित व्यक्ती राजकीय ओळखींचा आधार घेत असल्याचे उघड होत आहे. प्रवेश प्रक्रियेत आपले काम लवकर व्हावे, जागा निश्चित व्हावी किंवा नियमांमध्ये सवलत मिळावी, यासाठी अनेक जण थेट नेत्यांच्या संपर्कात असल्याचे दिसून येत आहे.कोणी मुलांच्या इंजिनिअरिंग प्रवेशासाठी प्रयत्न करत आहे, तर कोणी वैद्यकीय शिक्षणातील जागांसाठी शिफारशी मागत असल्याची चर्चा आहे. काही जण तर शैक्षणिक शुल्कात सवलत मिळावी किंवा फी कमी व्हावी यासाठीही राजकीय ओळखींचा वापर करत असल्याचे बोलले जात आहे. यामध्ये काही अधिकारी व कर्मचारी वर्गाचाही सहभाग असल्याची चर्चा आहे. कार्यालयीन वेळेत किंवा शासकीय वाहनांचा वापर करून नेत्यांच्या भेटी घेतल्या जात असल्याचा आरोप आता पुढे येऊ लागला आहे. त्यामुळे प्रशासनातील तटस्थतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. काही ठिकाणी अधिकृत बैठकींच्या नावाखाली राजकीय भेटी होत असल्याचेही बोलले जात आहे. त्यामुळे कार्यालयीन काम आणि वैयक्तिक हितसंबंध यातील सीमारेषा धूसर होत असल्याची टीका होत आहे.शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता आणि राजकीय हस्तक्षेप रोखण्याची मागणीही जोर धरू लागली आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कार्यालयीन साधनसंपत्तीचा गैरवापर होत असल्यास चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

चौकटकामासाठी 'जयघोष'ची स्पर्धासध्या विविध गटांमध्ये राजकीय नेत्यांचा जयघोष करण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. ज्या नेत्यांकडून काम होण्याची शक्यता आहे, त्या नेत्यांचे सार्वजनिक कौतुक, सोशल मीडियावर पोस्ट आणि बैठकींमध्ये स्तुतीसुमने उधळण्याचे प्रकार वाढले आहेत. विशेष म्हणजे, काही मंडळी एका नेत्यासमोर दुसऱ्या गटावर टीका करताना दिसत आहेत. विरोधी गटातील नेत्यांवर लाखोल्या वाहणे आणि दुसऱ्या गटासमोर त्यांच्याच विरोधात बोलणे, अशी दुहेरी भूमिका घेतली जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

चौकटफी कमी करण्यासाठीही राजकीय दबाव?शहरातील काही खासगी शिक्षण संस्थांमध्ये वाढत्या शुल्कामुळे पालकांवर आर्थिक ताण निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर काही मंडळी राजकीय शिफारशींच्या माध्यमातून फी कमी करून घेण्यासाठी प्रयत्नशील असल्याची माहिती समोर येत आहे. आर्थिक अडचण हा मुद्दा पुढे करून संस्थांवर दबाव आणण्याचे प्रकार वाढल्याचे सांगितले जात आहे.चौकटस्थानिक कार्यकर्त्यांना प्राधान्य देण्याची मागणीअनेक कार्यकर्त्यांकडून आता नेत्यांनी आपल्या मतदारसंघातील आणि जिल्ह्यातील स्थानिक व्यक्तींनाच अधिक जवळ करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. अधिकारी व कर्मचारी वर्ग हा बदली होणारा असतो. आज आहेत, उद्या दुसऱ्या ठिकाणी जातील. मात्र स्थानिक कार्यकर्ते आणि मतदार हे कायम सोबत राहतात, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली आहे. चौकट नेत्यांसमोरही मोठे आव्हानया घडामोडींमुळे राजकीय नेत्यांसमोरही मोठे आव्हान निर्माण झाले आहे. केवळ स्वार्थासाठी जवळ येणाऱ्या मंडळींना किती महत्त्व द्यायचे आणि खऱ्या कार्यकर्त्यांना कसे जपायचे, हा प्रश्न आता प्रत्येक गटप्रमुखासमोर उभा राहिला आहे.

# आईच्या पुण्यस्मरणार्थ दरवर्षी १०० झाडे लावण्याचा संकल्प : गणेश भोसले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** आईच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त वड, पिंपळ आणि लिंब यांसारखी देशी झाडे लावण्यात आली असून ती जतन करण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी केले. धर्मवीर संभाजी राजे प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने कै. लक्ष्मीताई पुंडलिक भोसले यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त विनायक नगर, समता कॉलनी आणि शांतीनगर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

यावेळी गणेश भोसले म्हणाले की, पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे ऋतुमानामध्ये मोठे बदल होताना दिसत आहेत. कोणत्याही ऋतूमध्ये ऊन, वारा, पाऊस आणि थंडीचा अनियमित अनुभव येत आहे. सध्या उन्हाळ्यात वाढलेल्या तापमानामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. त्यामुळे पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण आणि संवर्धनाची लोकचळवळ उभी राहणे काळाची गरज आहे.

गेल्या १५ ते २० वर्षांपासून प्रभागात दरवर्षी पावसाळ्यात स्वखर्चाने किमान शंभर झाडे लावून ती जगविण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. झाडांच्या संवर्धनासाठी दोन पाण्याच्या टँकरची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली. या कार्यक्रमास माजी महापौर भगवान फुलसौंदर, नगरसेवक प्रकाश भागानगरे, मा.नगरसेवक संजय चोपडा, उद्यान प्रमुख शशिकांत नजन, अवधूत फुलसौंदर, अशोक पवार, राजू यंदे, ईश्वर कोळी, रामदास खैरे, निलेश गांधी, डॉ. अभय मुथा, सुरेश डहाळे, राजेश थोरात, नरहरी सपकाळ, मुकुंद निकुंभ, राहुल बोरा, नितीन खैरे, मयूर म्हस्के, गणेश टाक, आनंद मुथा, जयकिशन दायमा, भरत फुलसौंदर, विजय फुलसौंदर, जनार्दन वाघ, संतोष ओहोळ, रुक्मिणी नन्नवरे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उद्देश फक्त स्पर्धा घेणे नसून खेळाडू घडवणे : फिरोदिया

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात झाला. रशियन ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव आणि अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे आयोजित या स्पर्धेला देशभरातील बुद्धिबळपटू, पालक आणि बुद्धिबळप्रेमींची मोठी उपस्थिती लाभली. या स्पर्धेत देशाच्या विविध राज्यातून २७५ पेक्षा अधिक खेळाडू सहभागी आहेत. या स्पर्धेत १४० आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी आहेत.यावेळी संघटनेचे सचिव यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, पारूनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी आदी उपस्थित होते. यावेळी नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, देशभरातील नामांकित बुद्धिबळपटूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला असून गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू, महाराष्ट्र आदी राज्यांतील पेक्षा २७० अधिक खेळाडूंनी सहभाग निश्चित केला आहे. अवघ्या साडेपाच वर्षांच्या बाल बुद्धिबळपटूपासून ते ९२ वर्षीय ज्येष्ठ खेळाडूपर्यंत विविध वयोगटातील स्पर्धक आपल्या बुद्धीचे कौशल्य पणाला लावणार आहे. संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी प्रस्ताविक केले. या स्पर्धेचे प्रमुख पंच म्हणून प्रवीण ठाकरे, पवन राठी, शिरीष इंदुरकर, शार्दुल तपासे, अमरीश जोशी, देवेंद्र ढोकळे, प्रशांत धंगेकर, विशाल गुजराती काम पाहणार आहेत. विशेष बाब म्हणजे या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे १०० लाकडी बुद्धिबळ पट आणि सोंगट्यांचा वापर महाराष्ट्रात प्रथमच करण्यात येत आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी संघटनेचे खजिनदार सुबोध ठोंबरे, सदस्य पारूनाथ ढोकळे, शाम कांबळे, प्रशांत धंगेकर, देवेंद्र ढोकळे, मनीष जस्वानी, प्रकाश गुजराती, चेतन कड, विशाल गुजराती संजय खडके, नवनीत कोठारी, डॉ. स्मिता वाघ, अनुराधा बापट, सौ. शुभदा ठोंबरे, सौ. रोहिणी आडकर , दत्ता घाडगे, स्वप्नील भगुरकर आदी परिश्रम घेत आहेत. या स्पर्धेचे सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे सर यांनी केले तर आभार खजिनदार सुबोध ठोंबरे यांनी मानले.

# बकरी ईद पार्श्वभूमीवर शांतता, स्वच्छता आणि सुरक्षेची मागणी

**अहिल्यानगर :** गुरुवारी साजरी होणाऱ्या बकरी ईद (ईद-उल-अजहा) सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता, कायदा-सुव्यवस्था आणि सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी प्रशासनाने विशेष उपाययोजना कराव्यात, तसेच भारताच्या कृषीप्रधान संस्कृतीत गाईला असलेले महत्त्व लक्षात घेऊन तिला 'राष्ट्रीय पशू' घोषित करण्याबाबत केंद्र सरकारकडे सकारात्मक शिफारस पाठवावी, अशी मागणी मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी, शांतता समितीचे सदस्य आणि आय लव्ह अहमदनगर फौंडेशनच्यावतीने करण्यात आली आहे. शहरात बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर आयोजित शांतता समितीच्या बैठकीदरम्यान मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांना निवेदन दिले. यावेळी आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, मा.नगरसेवक समद खान, मौलाना शफीक कासमी, खालिद शेख, अकबर अली शेख, नईम सरदार, संजू जहागीरदार, मोहसिन शेख आदी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे, बकरी ईद सण शांततेत आणि कायद्याच्या चौकटीत पार पडावा, यासाठी मुस्लिम समाज प्रशासनाला पूर्ण सहकार्य करेल. मात्र सणाच्या काळात काही समाजकंटक सोशल मीडियावर खोट्या किंवा जुन्या पोस्ट व्हायरल करून वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे व्हॉट्सप, इन्स्टाग्रामसह विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सायबर पोलिसांनी आधीपासूनच लक्ष ठेवून अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. तसेच कायदेशीर पद्धतीने मटणाची वाहतूक किंवा वाटप करणाऱ्या नागरिकांना केवळ संशयाच्या आधारावर अडवून कायदा हातात घेणाऱ्या आणि मारहाण करणाऱ्या समाजकंटकांवर तात्काळ कठोर कारवाई करावी. मुख्य नमाजच्या वेळी शहरातील ईदगाह आणि प्रमुख मशिदी परिसरात पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्याचे आवाहनही प्रशासनाला करण्यात आले आहे.

# 'पुमा' कंपनीचा बनावट लोगो वापरून कपड्यांची विक्री

## बालिकाश्रम रोडवर छापा : दोघांना अटक एक फरार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** प्रसिद्ध नामांकित कंपनीचा बनावट लोगो वापरून कपड्यांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या टोळीचा तोफखाना पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी एकूण २ लाख ३४ हजार ४५० रुपयांचा बनावट मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोघांना अटक केली असून एक मात्र फरार झाला आहे. नगरमधील बालिकाश्रम रस्त्यावर सुडके मळा परिसरात असलेल्या 'शिव स्पोर्ट्स अँड शुज मॉल' आणि 'आर. जी. स्पोर्ट्स अँड शुज मॉल' या दुकानांवर पोलिसांनी छापे टाकले. यावेळी शाहरुख इस्माईल शेख (वय २४, रा. बाराबाभळी, अहिल्यानगर), अरबाज राजू बागवान (वय २३, रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) आणि सौरभ रमेश सुडके (वय २४, रा. सुडके मळा, अहिल्यानगर) यांना अटक करण्यात आली आहे. तर शाहरुख शेख हा फरार झाला आहे. बनावट लोगो वापरून कपड्यांची विक्री होत असल्याच्या घटनेमुळे शहरासह जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलिस सुत्रांकडून समजलेली माहीती अशी की, बालिकाश्रम रस्त्यावरील काही दुकानांमध्ये प्रसिद्ध नामांकित कंपनीचा लोगो वापरून लोकल कपडे विकले जात असल्याची माहीती पुमा कंपनीच्या वरिष्ठांना लक्षात आली. याबाबत महेंद्र सोहन सिंग (वय ३६, रा. राजस्थान) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तोफखाना पोलिसांनी शाहरुख इस्माईल शेख (वय २४, रा. बाराबाभळी, अहिल्यानगर), अरबाज राजू बागवान (वय २३, रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) आणि सौरभ रमेश सुडके (वय २४, रा. सुडके मळा, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध कॉपीराईट कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. यातील आरोपी शाहरुख शेख हा फरार झाला असून अरबाज बागवान आणि सौरभ सुडके या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे.

बालीकाश्रम रस्ता परिसरातील 'शिव स्पोर्ट्स अँड शुज मॉल' आणि 'आर. जी. स्पोर्ट्स अँड शुज मॉल' या दोन दुकानांमध्ये ही कारवाई करण्यात आली. आरोपी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी नामांकित कंपनीचे बनावट टी-शर्ट, ट्रॅक पॅन्ट, जॅकेट आणि मोजे यांवर हुबेहूब लोगो लावून त्यांची विक्री करत होते. पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात मोठ्या प्रमाणावर बनावट कपडे आणि छापील टॅग हस्तगत करण्यात आले आहेत. पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी आणि पोलीस हवालदार आंधळे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# शिंगवे तुकाईच्या शेतकऱ्यांचे एमआयडीसी कार्यालयासमोर उपोषण सुरू

## वाढीव भरपाई, नोकरी आणि प्रकल्पग्रस्त हक्कांसाठी आंदोलन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नेवासा तालुक्यातील पांढरी पूल येथील औद्योगिक वसाहतीसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या मोबदल्याबाबत अन्याय झाल्याचा आरोप करत शिंगवे तुकाई येथील शेतकऱ्यांनी बुधवारी (ता. २७) अहिल्यानगर येथील एमआयडीसी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, पांढरी पूल येथील शासकीय औद्योगिक वसाहतीसाठी शिंगवे तुकाई परिसरातील सुमारे १६० शेतकऱ्यांची २५४ हेक्टर पिकाऊ जमीन संपादित करण्यात आली होती. या ठिकाणी काही उद्योग सुरू झाले असले तरी जमीन संपादनावेळी शासन आणि अधिकाऱ्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात आलेली नाहीत. तसेच भूसंपादन कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

शेतकऱ्यांनी शासनाकडे विविध मागण्या मांडल्या आहेत. इतर प्रकल्पांप्रमाणे एकरी ५० लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, प्रकल्पग्रस्तांना पांढरी पूल एमआयडीसीमध्ये व्यवसायासाठी हेक्टर २५ गुंठे मोफत जागा उपलब्ध करून द्यावी, प्रकल्पग्रस्त दाखले तातडीने द्यावेत, तसेच प्रत्येक बाधित कुटुंबातील किमान एका सदस्याला कायमस्वरूपी नोकरी द्यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय थकीत नुकसानभरपाई व्याजासह मिळावी, व्यवसायासाठी जागा न दिल्यास अतिरिक्त आर्थिक भरपाई द्यावी, प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना शासकीय सेवेत आरक्षण मिळावे आणि शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षण मोफत करण्यात यावे, अशाही मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या आहेत. या उपोषणात राजेश होंडे, पांडुरंग होंडे, म्हातारदेव पुंड, किसन होंडे, सुभाष दिघे, नामदेव कुऱ्हाड, दामोदर पुंड, आशिष ठोकळ, विमल आरु, शरद धइगे, रमेश आरु आदी शेतकरी सहभागी झाले आहेत.

### आंदोलन तीव्र करण्याचा इशारा

एमआयडीसी प्रशासनाने आंदोलनाची तातडीने दखल न घेतल्यास गुरुवार (ता. २८)पासून अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राजेश होंडे आणि पांडुरंग होंडे यांनी दिला आहे. यासाठी प्रशासनाला कोणतीही पूर्वसूचना दिली जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



# द•ख•ल

## साळुंके यांच्या अश्वत्थ डिझाईन स्टुडिओला ऐसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड



**अहिल्यानगर :** येथील अश्वत्थ डिझाईन स्टुडिओचे आर्किटेक्ट रोहित साळुंके आणि सोनू साळुंके यांना ऐसा च्या नगरमधील कार्यक्रमात पुणे येथील चेलाराम हॉस्पिटलमधील लँडस्केप प्रोजेक्टसाठी ऐसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड २०२६ ने सन्मानित करण्यात आले.बेस्ट डिझाइन औटसाईड अहिल्यानगर सिटी या विभागात या प्रकल्पाला द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला. या प्रकल्पामध्ये वेलनेस सेंटरच्या टेरेस लँडस्केपचे नियोजन व डिझाईन करण्यात आले असून, शांत व सकारात्मक वातावरण निर्मितीवर विशेष भर देण्यात आला होता. आमदार संग्रामभैय्या जगताप यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी ऐसाचे अध्यक्ष अभिजित देवि,सचिव भूषण पांडव,इंजि संजय चांदवले तसेच ऐसा चे सर्व पदाधिकारी, सदस्य व नगरकर उपस्थित होते. या यशाबद्दल अश्वत्थ डिझाईन स्टुडिओच्या टीमने क्लायंट,कन्सल्टंट,कॉन्ट्रॅक्टर तसेच प्रकल्पाशी संबंधित सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले आहेत. व त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## वाईन शॉप समोर मजुराला कोयत्याने मारले : चौघांविरूद्ध गुन्हा

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर: शहरातील लालटाकी परिसरातील अनिता वाईट शॉपसमोर काल रात्री एक धक्कादायक घटना घडली. येथे किरकोळ कारणावरून चार अनोळखी व्यक्तींनी एका मजुराला बेदम मारहाण केली. या घटनेत रोहित बबन शिंदे (वय २७ वर्षे, राहणार वारुळाचा मारुती, नालेगाव, अहिल्यानगर) हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रोहित शिंदे हा मजूर म्हणून काम करतो. दि. २५ मे २०२६ रोजी रात्री ११:१५ वाजण्याच्या सुमारास तो अनिता वाईट शॉपच्या समोरून जात असताना अचानक चार अनोळखी व्यक्ती तिथे आल्या. त्यांनी रोहितला कोणत्याही कारणाशिवाय विनाकारण वाईट वाईट शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. रोहितने विरोध करण्याचा प्रयत्न केला असता, त्या चारही जणांनी त्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली.हा वाद एवढ्यावरच थांबला नाही, तर त्या चार अनोळखी व्यक्तींपैकी एकाने आपल्या हातातील कोयत्यासारख्या लोखंडी हत्याराने रोहितवर थेट हल्ला केला. हा वार रोहितच्या उजव्या खांद्यावर लागल्याने तो गंभीर जखमी होऊन खाली पडला. घटनेनंतर हल्लेखोर तेथून पसार झाले. जखमी रोहितला तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या घटनेप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात चार अनोळखी आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस स्टेशनचे प्र. अधिकारी पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ, सहा. पो. नि. एम. एन. गोटला, पोलीस अंमलदार व्ही. सी. गंगावणे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस अंमलदार के. बी. गडाख करत आहेत.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला शहराध्यक्षपदी अर्चना गायकवाड



**अहिल्यानगर :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या शहराध्यक्षपदी अर्चना गायकवाड यांची निवड करण्यात आली. मुंबई येथील राष्ट्रवादी भवन येथे झालेल्या कार्यक्रमात ही घोषणा करण्यात आली. खा. निलेश लंके यांच्या शिफारशीवरून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खा. सुप्रिया सुळे तसेच महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे या उपस्थित होते. अर्चना गायकवाड यांच्या निवडीमुळे पक्षाच्या महिला संघटनात्मक बांधणीला बळ मिळणार असल्याची भावना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. यावेळी अर्चना गायकवाड यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी व्यापक उपक्रम राबविणार असल्याचे सांगितले. या निवडीबद्दल आमदार रोहित पवार, आ. जितेंद्र आव्हाड, जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे, प्रदेश उपाध्यक्ष हाजी शौकत तांबोळी, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अथर खान, जिल्हा कार्याध्यक्ष सीताराम काकडे, अल्पसंख्यांक कार्याध्यक्ष समीर पठाण, शहराध्यक्ष आलतमश जरीवाला, युवक अध्यक्ष रोहन शेलार, मावळा ग्रुपचे चंद्रकांत उजागरे, सुशांत म्हस्के, नगरसेवक योगिराज गाडे, शिवसेनेचे प्रतीक बारसे, शहर कार्याध्यक्ष अझहर शेख, मनीषा चोंदे, छाया पाचर्णे, मनीषा भलगट, जिल्हा उपाध्यक्ष मतीन शेख, सेवादल जिल्हाध्यक्ष रवी धनवटे, नीलेश मालपाणी, फय्याज तांबोळी आदींसह विविध मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## भिंगारमध्ये पूर्ववैमनस्यातून तरुणावर प्राणघातक हल्ला : चौघांविरूद्ध गुन्हा

**अहिल्यानगर :** भिंगार परिसरातील नगर-पाथर्डी रस्त्यावरील प्रकाश उपहारगृहासमोर काल रात्री दहा वाजण्याच्या सुमारास एका तरुणावर जुन्या कारणावरून चौघांनी मिळून जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या मारहाणीत गणेश सुरेश आळकुटे (वय ३० वर्षे, व्यवसाय- रंगकाम, राहणार- यशवंत नगर डेअरी फार्म, भिंगार, अहिल्यानगर) हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार, फिर्यादी गणेश आळकुटे हा काल रात्री रस्त्यावरून जात असताना आरोपी योगेश कांबळे, अभि वाघेला, सनी निकाळजे आणि तारा पाटोळे (सर्व राहणार भिंगार, अहिल्यानगर) यांनी त्याला विनाकारण अडवून अत्यंत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर सर्व आरोपींनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. वाद वाढल्याने आरोपी तारा पाटोळे याने जवळ असलेला लोखंडी कोयता काढून फिर्यादीच्या डोक्यावर आणि अंगावर गंभीर वार केले. तर उर्वरित तीन आरोपींनी परिसरात पडलेल्या विटांनी फिर्यादीला बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले. घटनेनंतर जखमी फिर्यादीला तात्काळ अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. रुग्णालयाकडून वैद्यकीय अहवाल आणि अधिकृत जबाब प्राप्त झाल्यानंतर कॅम्प पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास साहाय्यक पोलीस निरीक्षक मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रेणी पोलीस उपनिरीक्षक अकोलकर करत असून आरोपींना तात्काळ अटक करण्याची कारवाई सुरू आहे.

द•ख•ल

## बिबट्याने उडवली शेतकऱ्याची धांदल

**चास :** आंबेगाव तालुक्यातील चास माऊली येथील अटकमळा परिसरात बिबट्याच्या अचानक दर्शनाने एका शेतकऱ्याची मोठी धांदल उडाली. रामदास बारवे हे शेतकरी नेहमीप्रमाणे संध्याकाळच्या वेळी आपल्या शेतातील कृषी पंप बंद करण्यासाठी गेले होते. पंप बंद करून ते शेतातील बांधाने घराकडे परतत असताना अचानक अवघ्या दहा फुटांवर बिबट्या दिसल्याने त्यांची बोबडीच वळली.समोर अचानक बिबट्या दिसताच रामदास बारवे यांनी प्रसंगावधान राखत कोणतीही हालचाल न करता सावधपणे घराच्या दिशेने धाव घेतली. या घटनेमुळे त्यांची मोठी तारांबळ उडाली असून परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अटकमळा व परिसरात अधूनमधून बिबट्याचे दर्शन होत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे शेतकरी व ग्रामस्थांनी वनविभागाने तातडीने परिसराची पाहणी करून बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी पिंजरा लावावा, अशी मागणी केली आहे. तसेच रात्रीच्या वेळी शेतात जाणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहनही करण्यात येत आहे .

## गो-आहार संकलन टोपली उपक्रमाचा आळंदीत शुभारंभ

**आळंदी :** कमला एकादशीच्या पावन मुहूर्तावर रोजी आळंदी नगरपरिषद, इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च फंडेड प्रकल्प आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने गौ-आहार संकलन टोपली या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमांतर्गत आळंदीतील प्रत्येक प्रभागात घरोघरी विशेष टोपल्या वितरित करण्यात येणार असून, घरांमध्ये अतिरिक्त उरलेला अन्नसाठा तसेच पशुपयोगी खाद्य कचऱ्याचे संकलन दररोज सायंकाळी केले जाणार आहे. संकलित अन्न वडगाव रोड येथील गोशाळेत सुपूर्द करण्यात येणार असून, यामुळे गोमातेची सेवा आणि शहर स्वच्छता हे दुहेरी उद्दिष्ट साध्य होणार आहे. पर्यावरणपूरक आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या अभिनव संकल्पनेची अंमलबजावणी केल्याबद्दल प्रशासनातील अधिकारी, संबंधित संस्था आणि संस्थाचालकांचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपाध्यक्षा सुजाता तापकीर, गटनेते सचिन गिलबिले, नगरसेवक आदित्य घुंडरे, सागर कुऱ्हाडे, संतोष रासकर, ऋतुजा घुंडरे आणि पूजा घुंडरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## सामाजिक न्याय विभागाच्या विविध शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

**पुणे :** सामाजिक न्याय विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह (नविन), गुणवडी ता. बारामती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह सासवड ता. पुरंदर व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतीगृह तळेगाव दाभाडे येथे प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता ७ वी नंतर शालेय शिक्षण, कनिष्ठ महाविद्यालय, बिगर व्यावसायिक तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय अनुसूचित जातीमधील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना मोफत शासकीय वसतिगृह प्रवेश देण्यात येणारआहे. वसतिगृह प्रवेश हा प्रवर्गनिहाय आरक्षण व गुणवत्तेनुसार करण्यात येणार आहे. शासकीय वसतिगृहात विद्यार्थ्यांना विनामूल्य निवास, आंथरूण-पांघरूण, भोजन सुविधा, पुस्तके, स्टेशनरी, विविध शैक्षणिक बाबींसाठी आर्थिक सहाय्य तसेच दरमहा निर्वाह भत्ता यासह विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी https://hmas.mahait.oA°g/G$ या संकेतस्थळावर जाऊन प्रवेशासंबंधित सूचना वाचून ऑनलाईन अर्ज भरावा, असे आवाहन वस्तीगृहाच्या गृहपालाकडून करण्यात आले आहे.

## राज्यात लाळखुरकत लसीकरण मोहिम-९ ची जय्यत तयारी

**पुणे :** राज्यात लाळखुरकत रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत लसीकरण फेरी-९ साठी पशुसंवर्धन विभागाने पूर्वतयारीला वेग दिला आहे. मे अखेरपर्यंत राज्याला १ कोटी १९ लाख लस मात्रा उपलब्ध होणार असून, लसींच्या सुरक्षित साठवणुकीसाठी आणि वितरणासाठी नियोजन सुरू करण्यात आले आहे अशी माहिती आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिली. लसींचा साठा सुरक्षित ठेवण्यासाठी नव्याने २० 'वॉक-इन कोल्ड-रूम' उभारण्यात आल्या असून, प्रत्येक शीतगृहात सुमारे ३ लाख लस मात्रा साठवण्याची क्षमता आहे. याशिवाय विद्यमान शीतगृहांचाही पूर्ण क्षमतेने वापर करण्यात येणार आहे. आतापर्यंत लाळखुरकत लसीकरणाच्या ८ फेऱ्या यशस्वीपणे पूर्ण झाल्या असून, प्रभावी लसीकरणामुळे राज्यात अलीकडील काळात रोगाचा उद्रेक आढळलेला नाही. सलग दोन वर्षे रोगप्रादुर्भाव न झाल्यास महाराष्ट्राला 'लाळखुरकत रोगमुक्त' दर्जा मिळण्याची शक्यता असून, त्यामुळे दुग्ध, मांस आणि अंडी यांसारख्या पशुजन्य उत्पादनांच्या निर्यातीला चालना मिळू शकते. जिल्हानिहाय लस साठवण क्षमता तपासून माहिती तातडीने सादर करण्याचे आदेश आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत. तसेच ऑगस्ट २०२६ पासून प्रत्यक्ष लसीकरण मोहीम सुरू करण्यासाठी विभागाने तयारी सुरू केली आहे.

# सासवड उपबाजारात धान्याला तेजीत भाव

## ज्वारीला ४,२०० तर हरभऱ्याला ५,३०० रुपयांचा उच्चांकी दर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सासवड :** कृषी उत्पन्न बाजार समिती निरा अंतर्गत सासवड उपबाजार आवारात बुधवारी झालेल्या धान्य लिलावात मोठी गजबज आणि तेजी पाहायला मिळाली. ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ आणि हरभरा या विविध धान्यांच्या मोठ्या आवकेनंतरही दर्जेदार मालाला व्यापाऱ्यांकडून चांगला दर मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

सासवड उपबाजार आवारात शेतकरी आणि व्यापाऱ्यांच्या उपस्थितीत संपूर्ण लिलाव प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडली. शेतकऱ्यांनी माल स्वच्छ, वाळवून आणि योग्य प्रतवारी करून आणल्यास अधिक चांगला भाव मिळू शकतो. शेतकरी आणि व्यापाऱ्यांना आवश्यक सुविधा देण्यासाठी बाजार समिती प्रशासन कायम तत्पर आहे, अशी माहिती बाजार समिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

लिलाव प्रक्रिया कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संदीप सुधाकर फडतरे, उपसभापती बाळासो सोमा शिंदे यांच्या उपस्थितीत पारदर्शक पद्धतीने पार पडली. बाजार समितीचे संचालक देविदास संभाजी कामठे, शरद नारायण जगताप, अनिल बाप्पू माने, वामनभाऊ आश्रू कामठे, गणेश दत्तात्रय होले, सुशांत राजेंद्र कांबळे, महिला संचालक मनीषा देविदास नाझीरकर, महादेव लक्ष्मण टिळेकर आणि शाहजान रफिक शेख यांनी बाजार आवाराला भेट देऊन लिलाव प्रक्रियेची पाहणी केली.

आजच्या लिलावात सासवड परिसरातील व्यापारी रुपचंद कांडगे, अविनाश महाजन, राजेंद्र जाळींद्रे, नंदकुमार महाजन आणि सत्यवान पवार यांनी शेतमालासाठी स्पर्धात्मक बोली लावल्याने शेतकऱ्यांना अपेक्षेपेक्षा अधिक दर मिळाले. संपूर्ण लिलाव प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी कर्मचारी विकास कांबळे आणि नितीन किकले यांनी कामकाज सांभाळले.

बाजार समितीच्या अधिकृत नोंदीनुसार, ज्वारीची १५८ क्विंटल आवक झाली असून १५० क्विंटल जावक झाली. ज्वारीला किमान २,८०० तर कमाल ४,२०० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. सरासरी दर ३,५०० रुपये राहिला.

बाजरीची १२७ क्विंटल आवक झाली असून १२५ क्विंटल विक्री झाली. बाजरीला किमान २,१०० तर कमाल ३,१०० रुपये दर मिळाला. सरासरी दर ३,४०० रुपये नोंदवला गेला.

गव्हाची सर्वाधिक १८७ क्विंटल आवक झाली. त्यापैकी १८५ क्विंटल विक्री झाली. गव्हाला किमान २,२०० तर कमाल ३,१०० रुपये दर मिळाला. सरासरी दर २,६०० रुपये राहिला.

हरभऱ्याची १८ क्विंटल आवक झाली असून संपूर्ण मालाची विक्री झाली. हरभऱ्याला किमान ५,००० तर कमाल ५,३०० रुपये प्रति क्विंटल असा दिवसातील उच्चांकी दर मिळाला. सरासरी दर ५,१५० रुपये नोंदवला गेला.

तांदळाच्या व्यवहारातही व्यापाऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला असून आगामी काळात नवीन तांदळाची आवक वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

गेल्या काही दिवसांपासून हवामानातील बदल आणि बाजारभावातील चढ-उतारामुळे शेतकरी चिंतेत होते. मात्र, सासवड उपबाजारातील पारदर्शक लिलाव पद्धती, अचूक वजन आणि रोख व्यवहारामुळे पुरंदर तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर येथे शेतीमाल विक्रीसाठी आणत असल्याचे चित्र दिसून आले.



सासवड उपबाजार आवारातील धान्य लिलावावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संदीप सुधाकर फडतरे, उपसभापती बाळासो सोमा शिंदे, संचालक देविदास संभाजी कामठे, शरद नारायण जगताप, अनिल बाप्पू माने, वामनभाऊ आश्रू कामठे, गणेश दत्तात्रय होले, सुशांत राजेंद्र कांबळे, मनीषा देविदास नाझीरकर, महादेव लक्ष्मण टिळेकर, शाहजान रफिक शेख, व्यापारी, कर्मचारी आणि पुरंदर तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

## शिरूर तालुक्यात वृद्ध शेतकऱ्यावर जीवघेणा हल्ला

### जाब विचारल्याने पाडले दात, दोघांवर गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाबळ :** शेतात घुसलेली जनावरे बाजूला घेऊन बांधण्यास सांगितल्याच्या कारणावरून एका ८० वर्षीय वृद्ध शेतकऱ्याला दगडाने बेदम मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना शिरूर तालुक्यातील कवठे यमाई येथे घडली आहे. या मारहाणीत वृद्धाचा एक दात पडला असून तीन दात निकामी झाले आहेत. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.बाजीराव काशीबा पोकळे (वय ८० वर्षे, धंदा-शेती, रा. कवठे यमाई, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून संजय शिवराम पोकळे व सुनील शिवराम पोकळे (दोघे रा. कवठे यमाई, ता. शिरूर, जि. पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी बाजीराव पोकळे हे दि. २० मे रोजी संध्याकाळी ६:३० वाजण्याच्या सुमारास कवठे यमाई येथील आपल्या शेतात होते. त्या वेळी त्यांना शेतात आरोपी संजय पोकळे याची जनावरे दिसली. बाजीराव यांनी संजयला 'तुझी जनावरे माझ्या शेतात आली आहेत, ती बाजूला नेऊन बांध' असे सांगितले. याचा राग आल्याने संजय याने 'मी जनावरे बांधणार नाही' असे म्हणून चिडून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. बाजीराव यांनी शिवीगाळ का करतो असे विचारल्याचा अधिक राग आल्याने, संजयने जवळ पडलेला दगड हातात घेऊन बाजीराव यांच्या कपाळावर व तोंडावर मारून गंभीर दुखापत केली. तसेच उजव्या पायाच्या पोटरीवर मारून जखमी केले. हा वाद सुरू असतानाच संजयचा भाऊ सुनील शिवराम पोकळे हा त्या ठिकाणी आला.

## पुणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक-२०२६

### नोडल अधिकारी कामकाजाबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे नियुक्ती आदेश जारी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांच्याकडील १८ मे २०२६ रोजी प्रसिद्धीपत्रकान्वये महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पुणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक-२०२६ जाहीर करण्यात आली आहे; या अनुषंगाने पुणे जिल्हास्तरावर निवडणूक विषयक विविध कामकाजाच्या अनुषंगाने नोडल अधिकारी व सहायक नोडल अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा पुणे स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.



सुरेखा माने, उपजिल्हाधिकारी यांच्याकडे मतदान पेटी व्यवस्थापन व निवडणूक साहित्य आणि स्टेशनरी व्यवस्थापन, वनश्री लाभशेटवार, उपजिल्हाधिकारी यांच्याकडे निवडणूक प्रशिक्षण व्यवस्थापन, उमाकांत कडनोर, तहसीलदार यांच्याकडे अधिकारी व कर्मचारी नियुक्ती आणि मतपत्रिका छपाई व वाटप, संदीप कदम, उपायुक्त यांच्याकडे वाहन अधिग्रहण, वाहन व्यवस्थापन व वाहतूक आराखडा, संगीता मिना, एनआयसी यांच्याकडे संगणकीकरण व्यवस्थापन व मतमोजणी नमुने तयार करणे, सतीश थेटे, श्वेता पवार तहसीलदार आणि दिलीप शिंदे, पोलीस उपअधीक्षक यांच्याकडे कायदा व सुव्यवस्था व पोलीस डिप्लॉमेंट आराखडा तसेच आदर्श आचारसंहिता व्यवस्थापन, देवराम शेळके, सहसंचालक यांच्याकडे निवडणूक खर्च व्यवस्थापन विषयक कामकाजाची जबाबदारी देण्यात आली आहे.

## नाफेडकडून कांदा खरेदीचा निर्णय संपूर्ण महाराष्ट्रात लागू करा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वळती :** केंद्र सरकारने नाफेडमार्फत नाशिक जिल्ह्यातील कांदा १५ रुपये ८० पैसे प्रति किलो दराने खरेदी करण्याचा निर्णय सोमवारी (दि. २५) रात्री जाहीर केला असला, तरी हा निर्णय केवळ नाशिक जिल्ह्यापुरता मर्यादित ठेवू नये, तर महाराष्ट्रातील सर्वच कांदा उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळावा, अशी ठाम मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांनी केली आहे.

या संदर्भात त्यांनी प्रभारी जिल्हाधिकारी गजानन पाटील तसेच अतिरिक्त जिल्हाधिकारी सतीश राऊत यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

देवदत्त निकम यांनी प्रशासनाशी संवाद साधताना सांगितले की, राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या मोठ्या आर्थिक संकटातून जात आहे. कांद्याला बाजारात अत्यंत कमी भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांचा



उत्पादन खर्चही निघत नाही. बियाणे, खते, औषधे, मजुरी, वाहतूक आणि साठवणूक खर्च प्रचंड वाढलेला असताना कांद्याचे बाजारभाव मात्र घसरले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती काहीच राहत नसल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. नाशिक जिल्ह्यासाठी जाहीर करण्यात आलेला नाफेडचा खरेदी निर्णय हा स्वागतार्ह असला, तरी पुणे, अहमदनगर, सोलापूर, धुळे, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, बीड आणि इतर कांदा उत्पादक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ मिळणे आवश्यक आहे. अन्यथा राज्यातील इतर भागातील शेतकऱ्यांवर अन्याय होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.यावेळी त्यांनी शासनाकडे मागणी करताना सांगितले की, कांद्याला हमीभाव मिळाला पाहिजे, तसेच नाफेडमार्फत मोठ्या प्रमाणात खरेदी केंद्रे सुरू करून शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा. केंद्र आणि राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय त्वरीत घेतले नाहीत. तर शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी निर्माण होण्याची शक्यता .

## नीरा बाजार समितीत गुळाची आवक सुरू;

### सरासरी ४,४०० रुपये दर

**अनिकेत काळे**

**नाझरे सुपे :** तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती नीरा येथे गुळाची आवक सुरू झाली असून, चालू हंगामात गुळाला सरासरी ४,४०० रुपये प्रति क्विंटल असा समाधानकारक भाव मिळत आहे. बाजार समितीने नुकतीच गुळ आवक आणि दराची अधिकृत आकडेवारी जाहीर केली असून, यामध्ये गुळाचे दर स्थिर असल्याचे दिसून येत आहे. या सर्व व्यवहारांवर बाजार समितीचे सभापती संदिप सुधाकर फडतरे आणि उपसभापती बाळासो सोमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष लक्ष ठेवण्यात आले आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती नीरा (ता. पुरंदर, जि. पुणे) येथे नुकतीच गुळाची आवक झाली. बाजार समितीने दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १९ मे २०२६ रोजी बाजारपेठेत एकूण ९९ गुळ बॉक्स म्हणजेच सुमारे २० क्विंटल गुळाची आवक नोंदवली गेली आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत गुळाची मागणी वाढली असून, त्यानुसार दरामध्येही चांगली तेजी पाहायला मिळत आहे. या प्रसंगी बाजार समितीचे संचालक देविदास संभाजी कामठे, शरद नारायण जगताप, संचालक मनिषा देविदास नाझीरकर, महादेव लक्ष्मण टिळेकर आणि शाहजहान रफिक शेख उपस्थित होते.

## मसाप स्नेहबंध' पुरस्काराने अशोक सुलाखे यांचा गौरव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महाराष्ट्र साहित्य परिषद यांच्या वतीने म. श्री. दीक्षित यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा सन २०२५ चा प्रतिष्ठेचा 'मसाप स्नेहबंध' पुरस्कार पुस्तकप्रेमी अशोक सुलाखे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वर्धापन दिनाच्या निमित्त आयोजित कार्यक्रमात साहित्य, वाचन संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी




जपणाऱ्या सुलाखे यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्यास अविनाश धर्माधिकारी, अभिनेते ऋषिकेश जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण तसेच प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक यांची प्रमुख उपस्थिती होती. अशोक सुलाखे हे पुस्तकप्रेमी म्हणून विशेष ओळखले जातात. वाचन संस्कृती रुजविण्यासाठी त्यांनी आतापर्यंत दहा हजारांहून अधिक पुस्तके विविध मान्यवरांना भेट स्वरूपात दिली आहेत. विशेष म्हणजे त्यांनी स्वतःची पेन्शनही पुस्तक प्रचार आणि वाचन चळवळीसाठी खर्च केली आहे. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या कार्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी कौतुक व्यक्त केले. कार्यक्रमात साहित्य, वाचन आणि सामाजिक जाणीवा जपणाऱ्या व्यक्तींमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

## पंधरा गुन्ह्यांतील नॉन बेलेबल वॉरंटधारक फरार आरोपी अखेर जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** शहर पोलीसांनी अत्यंत धाडसी, कायदेशीर, शिताफीपूर्ण आणि नियोजनबद्ध कारवाई करत तब्बल १५ गुन्ह्यांमध्ये न्यायालयाने नॉन बेलेबल वॉरंट जारी केलेला सराईत फरार आरोपी शंकर उर्फ पोक्या प्रकाश आडके, रा. मळद, ता. बारामती, जि. पुणे यास अखेर जेरबंद करण्यात मोठे यश संपादन केले आहे. अनेक वर्षांपासून न्यायालयीन प्रक्रियेला सातत्याने चकवा देत पोलिस व न्यायालयीन यंत्रणेसमोर मोठे आव्हान निर्माण करणारा हा आरोपी अखेर बारामती शहर पोलिसांच्या जाळ्यात अडकला असून या धडाकेबाज कारवाईमुळे संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

सदर आरोपीविरुद्ध बारामती शहर पोलीस स्टेशन, बारामती तालुका पोलीस स्टेशन तसेच वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन येथे गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असून खालील गुन्ह्यांमध्ये न्यायालयाने त्याच्याविरुद्ध नॉन बेलेबल वॉरंट जारी केले होते.

विविध गुन्ह्यांमध्ये न्यायालयाने त्यास जामीन मंजूर केल्यानंतर आरोपीने न्यायालयीन प्रक्रियेपासून जाणीवपूर्वक पळ काढण्यास सुरुवात केली होती. न्यायालयाकडून वारंवार समन्स, नोटिसा तसेच वॉरंट बजावण्यात येऊनही आरोपी कोणत्याही सुनावणीस हजर राहत नव्हता. परिणामी संबंधित न्यायालयांनी त्याच्याविरुद्ध नॉन बेलेबल वॉरंट जारी केले होते. न्यायालयीन आदेशांचे सातत्याने उल्लंघन करणाऱ्या या आरोपीचा शोध घेण्यासाठी बारामती शहर पोलीस सातत्याने प्रयत्नशील होते.

■ नदीत उडी...
■ उसाच्या फडात लपण्याचा प्रयत्न...
■ पण बारामती शहर पोलिसांच्या जिद्दीसमोर अखेर शरणागती

मिळालेल्या माहितीनुसार २४ मे २०२६ रोजी सकाळी सुमारे ७:०० वा. बारामती शहर पोलीसांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, शंकर उर्फ पोक्या प्रकाश आडके हा दशविधी कार्यक्रमाकरिता आपल्या मूळ गावी आला आहे. माहिती अत्यंत संवेदनशील व महत्त्वाची असल्याने पोलिस हवालदार टापरे, पोलीस शिपाई गिरीश नेवसे व पोलीस शिपाई वैभव मदने यांनी कोणताही वेळ न दवडता तत्काळ पथक तयार करून संबंधित ठिकाणी धाव घेतली. पोलीस पथक घटनास्थळी पोहोचताच आरोपीस पोलिसांची चाहूल लागली आणि त्याने चित्रपटातील थरारक दृश्यालाही मागे टाकेल अशा पद्धतीने पळ काढण्यास सुरुवात केली. स्वतःस अटक होऊ नये यासाठी आरोपीने थेट करा नदीच्या उंच भिंतीवरून नदीत उडी घेतली. मात्र बारामती शहर पोलिसांनी कोणतीही भीती न बाळगता आणि जीवाची पर्वा न करता त्याच्या मागे धाव घेतली. नदीतून पळत सुटलेला आरोपी काही वेळातच नदीकाठची भिंत चढून जवळील दाट उसाच्या फडात शिरला. उंच वाढलेले उसाचे पीक, अरुंद पायवाटा आणि पूर्ण परिसरातील शांतता यामुळे आरोपीचा शोध घेणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते.



मात्र गुन्हेगार कितीही चलाख असला तरी कायद्यापासून कायम लपून राहू शकत नाही हा निर्धार मनात ठेवून बारामती शहर पोलिसांनी स्थानिक नागरिकांची मदत घेत परिसरात कसून शोधमोहीम सुरू ठेवली. जवळपास दीड तास सुरू असलेल्या या थरारक शोधमोहीमेनंतर उसामध्ये संशयास्पद हालचाली दिसून आल्या. पोलिसांनी तात्काळ संपूर्ण परिसराला घेराव घालत अत्यंत शिताफीने आरोपीस पकडून ताब्यात घेतले. अनेक वर्षांपासून पोलिसांना आणि न्यायालयाला चकवा देणारा आरोपी अखेर बारामती शहर पोलिसांच्या धाडसी कारवाईसमोर निष्प्रभ ठरला.

सदर आरोपीस कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून माननीय न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता, माननीय न्यायालयाने आरोपीस येरवडा कारागृह, पुणे येथे न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. आरोपीस जेलमध्ये रवानगी करण्यात आल्यानंतर परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांकडून बारामती शहर पोलिसांच्या या धाडसी कारवाईचे मोठ्या प्रमाणात कौतुक करण्यात येत आहे.

या कारवाईमुळे न्यायालयीन प्रक्रियेपासून पळून जाणाऱ्या तसेच वारंवार कायद्याला आव्हान देणाऱ्या आरोपींना स्पष्ट संदेश मिळाला आहे की, बारामती शहर पोलीस कोणत्याही गुन्हेगारास कायद्यापासून दूर पळू देणार नाहीत. नदी, शेत, अंधार किंवा कोणतेही लपण्याचे ठिकाण गुन्हेगाराला वाचवू शकत नाही, कारण कायद्याचा हात अधिक वेगवान आणि अधिक मजबूत आहे.

सदर आरोपीविरुद्ध न्यायालयीन प्रक्रियेतील कागदपत्रे, वॉरंट अंमलबजावणी, न्यायालयीन समन्वय तसेच आरोपीचा सातत्याने पाठपुरावा करण्यात बारामती शहर पोलीस स्टेशनच्या महिला रणरागिनी पोलीस हवालदार सगुना आवटे व पोलीस हवालदार उमा कोकरे यांचा देखील अत्यंत मोलाचा सहभाग राहिला असून त्यांच्या मेहनतीमुळे सदर कारवाईस मोठी मदत झाली आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड तसेच बारामती शहर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार टापरे, पोलीस शिपाई गिरीश नेवसे, पोलीस शिपाई वैभव मदने, महिला पोलीस हवालदार सगुना आवटे, पोलीस हवालदार उमा कोकरे व बारामती शहर पोलीस स्टेशनच्या पथकाने अत्यंत धाडस, चिकाटी, कायदेशीर कौशल्य आणि शिताफीने पार पाडली आहे. बारामती शहर पोलीसांनी स्पष्ट केले असून, यापुढेही न्यायालयाने नॉन बेलेबल वॉरंट जारी केलेले तसेच गुन्ह्यांमधून फरार असलेले आरोपी यांचा शोध घेऊन अशाच धडाकेबाज, कायदेशीर आणि परिणामकारक कारवाया सातत्याने सुरू ठेवण्यात येणार आहेत.

## माणिक प्रभू संस्था पिठाधीश खंडोबा देवदर्शना करिता जेजुरीत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जेजुरी :** माणिकनगर (कर्नाटक) येथील श्री माणिक प्रभू संस्थानचे पीठाधीश श्री ज्ञानराज माणिकप्रभू महाराज यांनी आज खंडोबा गडावर येऊन देवदर्शन घेतले.
देवदर्शन झाल्यावर श्री मार्तंड देवसंस्थानचे विश्वस्त ॲड. पांडुरंग थोरवे यांनी त्यांचा पगडी , घोंगडी व काठी देऊन सत्कार केला . जेजुरीचा खंडोबा अठरा पगड जातीचे कुलदैवत आहे. या देवाच्या भक्तिमार्गातून सर्व जाती धर्माचे लोक एकत्र नांदत आहेत ,असे श्री ज्ञानराज माणिक प्रभू महाराज यांनी सांगितले.
यानंतर देवस्थानच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना खंडा (तलवार) उचलून कसरतीची प्रात्यक्षिके दाखवली. यावेळी श्री ज्ञानराज प्रभू महाराजांनी हातात खंडा उचलून घेतला.
आज सकाळी साडेअकरा वाजता श्री ज्ञानराज माणिक प्रभू महाराज यांचे खंडोबा गडावर आगमन झाले. मुख्य मंदिरातील स्वयंभू लिंगाचे दर्शन घेतल्यावर त्यांनी दत्त अवतार माणिक प्रभू महाराजांनी खंडोबा देवावर पूर्वीच्या काळी लिहिलेली पदे, श्लोक , म्हणत देवदर्शन केले. यावेळी पुजारी चेतन सातभाई, अथर्व बारभाई ,



अनिल आगलावे ,वैभव दीडभाई, तुषार आगलावे उपस्थित होते .तळी भंडारा झाल्यावर भंडाऱ्याची उधळण करीत सर्वांनी ''येळकोट येळकोट,जय मल्हार '' असा जयघोष केला . नवरात्र महालामध्ये श्री माणिक प्रभू यांच्याबरोबर आलेल्या परिवारातील भक्तगणांनी खंडोबावरील अनेक जुनी गाणी ,पदे अभंग म्हणून सेवा केली.
यावेळी उपस्थित भाविक भजनामध्ये तल्लीन झाले .
२०० वर्षांपूर्वी श्री सद्गुरु माणिक प्रभू महाराज यांनी कुलदैवत खंडोबावर अनेक पदे,अष्टक,गाणी, मल्हारी सहस्त्रनाम,आरत्या आदींची रचना केली. जेजुरीचा खंडोबा त्यांचे कुलदैवत आहे.
'' कुलस्वामी माझा देव खंडेराय , स्मरण करिता खंडेराय, करुणानिधी खंडेराया '' इत्यादी अनेक पदांचे आज गडावर भक्तगणांनी गायन केले.
देवस्थानचे विश्वस्त ॲड .पांडुरंग थोरवे यांच्या हस्ते सद्गुरु ज्ञानराज महाराज यांचा गौरव करण्यात आला. यावेळी व्यवस्थापक आशिष बाठे ,माजी विश्वस्त डॉ प्रसाद खंडागळे ,घनश्याम मोरे , गणेश थोरात आदी उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश खाडे यांनी केले.
जेजुरी गावामध्ये श्री माणिक प्रभू महाराजांच्या पादुका व ज्ञानराज महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

द•ख•ल

## इसारवाडे यांचे कार्य उल्लेखनिय : गिरी महाराज

**हातगाव :** जिल्ह्यात वेगवेगळ्या तालुक्यात ३७ वर्ष प्रदीर्घ अशी सेवा करणारे पंचायत समितीचे विस्तार अधिकारी मल्हारी पुजाबा इसारवाडे यांनी केलेले काम हे आज त्यांच्या सेवा पूर्तीला उपस्थितीतून दिसून येत आहे असे मत वैजापूर तालुक्यातील सरला बेट येथील ह.भ.प. स्वामी विश्वनाथ गिरी महाराज यांनी व्यक्त केले. समाजाला चांगल्या दिशेने नेण्यासाठी व समाज योग्य दिशेने घडवण्यासाठी आज चांगल्या माणसाची समाजाला गरज आहे. याच माध्यमातून मल्हारी इसरवाडे यांनी प्रशासकीय सेवेत उल्लेखनीय कार्य केले. शेवगाव तालुक्यातील नवीन खामपिंप्रीचे रहिवासी, जामखेड पंचायत समितीचे विस्तार अधिकारी इसारवाडे हे आपल्या प्रशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. बुधवारी चापडगावच्या शिवम मंगल कार्यालयात सेवापूर्ती गौरव समारंभ आयोजित केला होता. यावेळी तुकाराम महाराज संस्थानचे ह.भ.प मारुती महाराज झिरपे, मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील, शेवगाव पं. स. गटविकास अधिकारी सोनल शहा, मा.जि.प. सदस्य नितीनराव काकडे, जामखेडचे ग्रामविकास अधिकारी शुभम जाधव, सिन्नरचे गटविकास अधिकारी अशोक भवारी, पशुसंवर्धन विभागाचे जगदीश पालवे, सुरेश पाटेकर, विस्तार अधिकारी सचिन भाकरे, तालुका अभियानचे फिरोज सय्यद, ग्रामसेवक संघटनेचे युवराज पाटील, विस्तार अधिकारी दादासाहेब शेळके, काँग्रेसचे राजेंद्र कोकणे, भाऊसाहेब पवार, चित्रसेन रननवरे, ॲड रननवरे, राजेंद्र ढमढेरे, लक्ष्मण इसरवाडे, रामजी अंधारे, युवराज पाटील, रामेश्वर चोपडे, बप्पासाहेब इसरवाडे, अशोक इसरवाडे, नानासाहेब मडके, अरुण पवार, अमृत इसरवाडे, अंबादास कळमकर, बबन भुसारी, कल्याणराव नेमाने, जुबेरभाई शेख, कैलास खेवरे, सुधीर भोंग, कूद्दुस पठाण, रामनाथ लेंडाळ, अर्जुन दराडे यांच्यासह सर्वच क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिपकराव कुसळकर यांनी तर प्रस्ताविक भारतराव कोठुळे यांनी केले. आभार ग्रामसेवक सुनील काळे यांनी मानले.

## राज्यस्तरीय ‘महाराष्ट्र गौरव’ पुरस्काराने श्रीगोंद्याच्या शिक्षकांचा सन्मान

**श्रीगोंदा :** गुरु हा फक्त धडा शिकवत नाही, तर आयुष्य घडवत असतो, याची प्रचिती पुन्हा एकदा श्रीगोंदा तालुक्याने दिली आहे. अजिंक्य सोशल फौंडेशन पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र दिनानिमित्त प्रदान करण्यात आलेल्या राज्यस्तरीय ‘महाराष्ट्र गौरव शिक्षक रत्न’ पुरस्काराने मांडवगण येथील उपक्रमशील शिक्षक राजेंद्र वाघमारे, संगीता राऊत आणि डॉ. संध्या चव्हाण यांना गौरविण्यात आले. हा सन्मान पिंपरी चिंचवड येथील लोकनेते लक्ष्मणराव जगताप सभागृहात संत तुकाराम महाराजांचे दहावे वंशज शिवाजी महाराज मोरे, डॉ. अशोक सोनवणे, डॉ. राजेंद्र मोरे, नगरसेवक ड. विनायक दादा गायकवाड, फौंडेशनचे अध्यक्ष सचिन पवार, उपाध्यक्षा संगीता भालेराव आणि विश्वस्त बाळासाहेब राठोड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.डॉ. संध्या विजय चव्हाण यांनी शिक्षणशास्त्र विषयात एम.फिलच्या आठ आणि पीएच.डी.च्या पाच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले असून त्यांनी पाच पुस्तकांचे लेखनही केले आहे. त्यांच्या संशोधनपर तीस शोधनिबंधांचे राष्ट्रीय व राज्यस्तरावर प्रकाशन झाले आहे. विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन, व्याख्याने, कृती कार्यशाळा तसेच वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनासारखे सामाजिक उपक्रम त्यांनी सातत्याने राबवले आहेत.राजेंद्र वाघमारे यांनी शाळेतील वंचित विद्यार्थ्यांसाठी बचत बँक, पाठांतर स्पर्धा आणि उपस्थिती वाढविण्यासाठी बक्षीस योजना असे उपक्रम राबवून शिक्षणात वेगळा ठसा उमटवला. तर संगीता राऊत यांनी विद्यार्थ्यांचे झटपट वाचन, सुंदर हस्ताक्षर आणि मुलींसाठी आरोग्यविषयक चांगल्या सवयी विकसित करण्यासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले.या तिन्ही शिक्षकांच्या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार विश्वस्त बाळासाहेब राठोड यांनी मानले. पुरस्कारप्राप्त शिक्षकांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## सर नेस वाडिया फौंडेशन व लोकसहभागातून चांभुर्डी येथील बंधाऱ्याचे खोलीकरण



**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील चांभुर्डी गावातील जुन्या बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे त्याची पाणी साठवण क्षमता कमी झाली होती. परिणामी पावसाळ्यातही बंधाऱ्यात अत्यल्प प्रमाणात पाणी साठत असल्याने परिसरातील शेतकऱ्यांना त्याचा फटका बसत होता. मात्र आता सर नेस वाडिया फाऊंडेशन, ब्रिटानिया इंडस्ट्रीज लिमिटेड आणि ग्रामस्थांच्या लोकसहभागातून या बंधाऱ्याचे खोलीकरण करण्यात आल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. चांभुर्डी येथील रहिवासी सागर चव्हाण यांच्या निदर्शनास ही समस्या आल्यानंतर त्यांनी ब्रिटानिया इंडस्ट्रीज लिमिटेडच्या व्यवस्थापनाशी संपर्क साधून बंधाऱ्याच्या स्थितीबाबत माहिती दिली. कंपनी व्यवस्थापनाने या सूचनेची तात्काळ दखल घेत कंपनीच्या सीएसआर उपक्रमांतर्गत सर नेस वाडिया फाऊंडेशनच्या माध्यमातून बंधाऱ्यातील गाळ काढण्याचे काम हाती घेतले. स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने बंधाऱ्याचे खोलीकरण पूर्ण करण्यात आले असून यावर्षीच्या पावसाळ्यात या बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साठेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

## आयसीएमआरच्या कोयंबतूर येथील राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यशाळेत सक्रिय सहभाग

**माहिजळगाव :** जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथील रहिवासी तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संलग्नीत अंबाजोगाई येथील योगेश्वरी महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागाचे जैवविविधता संशोधक व युवा शास्त्रज्ञ रणजित रावसाहेब राऊत यांनी तामिळनाडू राज्यातील कोयंबतूर येथील कोंगुनाडू आर्टस् ॲन्ड सायन्स कॉलेज येथे दिनांक १८ मे ते २२ मे २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या जिनोमीक न्ड मेटाजीनोमीक प्रोचेस फॉर डिटेक्शन न्ड ट्रॅकींग ऑफ न्टीमायक्रोबीयल रेजिस्टन्स पॅथोजन्स या विषयावरील आय.सी.एम.आर. प्रायोजीत पाच दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेत महाराष्ट्रातून एकमेव प्रतिनिधी म्हणून सक्रिय सहभाग नोंदवला. देशभरातील विविध राज्यांतील संशोधक, प्राध्यापक आणि युवा वैज्ञानिक या कार्यशाळेत सहभागी झाले होते. या कार्यशाळेमध्ये रणजित राऊत यांनी जीनोमिक्स, मेटाजीनोमिक्स, न्टीमायक्रोबीयल रेझिस्टन्स, प्रतिजैविके, रोगजंतूंचे शोध व ट्रॅकिंग, आधुनिक जैवतंत्रज्ञान तंत्रे आणि संशोधनातील नव्या संकल्पना याविषयी प्रत्यक्ष प्रशिक्षण घेतले. तसेच विविध तज्ज्ञ वैज्ञानिकांशी संवाद साधून संशोधन क्षेत्रातील अनुभवांची देवाणघेवाण केली. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी महाराणी महाविद्यालय मैसूर येथील जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.हनुमंथप्पा मकारी व मान्यवरांच्या हस्ते सहभागी प्रमाणपत्र देऊन रणजित राऊत यांचा सन्मान करण्यात आला. रणजित राऊत हे ग्रामीण भागात जैवविविधता संवर्धन, पर्यावरण जनजागृती, सेंद्रिय शेती, औषधी वनस्पती संवर्धन, मियावाकी वननिर्मिती आणि समुदाय सहभाग या क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांमध्ये सहभाग नोंदविला आहे.

# दैनिक राष्ट्र सह्याद्रीच्या वृत्ताची दखल

## जातेगाव–राळेगण सिध्दी रस्त्याच्या कामाला प्रारंभ : नागरिकांमधून समाधान

**विशाल फटांगडे । राष्ट्र सह्याद्री**

**जातेगाव :** गेल्या अनेक महिन्यांपासून रखडलेल्या जातेगाव–राळेगण सिद्धी रस्त्याच्या कामाला अखेर आज दुपारी ३ वाजता प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे. खराब रस्ता, मोठमोठे खड्डे, धुळीचे साम्राज्य आणि अपूर्ण कामामुळे नागरिक, विद्यार्थी, शेतकरी तसेच वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. या रस्त्याची दयनीय अवस्था प्रसारमाध्यमांमधून समोर आल्यानंतर तसेच नागरिकांच्या तीव्र नाराजीमुळे प्रशासन व संबंधित यंत्रणा हलल्याचे चित्र दिसून आले.

पळवे खुर्द, पळवे बुद्रुक, घाणेगाव, म्हसणे आणि जातेगाव परिसरातील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी दररोज या मार्गाने प्रवास करतात. खराब रस्त्यामुळे अपघाताचा धोका वाढला होता. त्यामुळे रस्त्याचे काम दर्जेदार व तातडीने पूर्ण करण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत होती.

> पुढील ८ दिवसांत काम पूर्ण करण्यात येईल, असे झथऊ विभागाकडून आश्वासन देण्यात आले असून, पावसाळा सुरू होण्यापूर्वी दर्जेदार व सुरक्षित रस्ता नागरिकांसाठी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.
>
> **– डॉ. राहुल संपतराव पोटे जागरूक नागरिक, राळेगणसिद्धी**



**अण्णांच्या हस्तक्षेपानंतर रखडलेल्या रस्त्याच्या कामाला गती**

गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जातेगाव–राळेगण सिद्धी रस्त्याच्या कामामुळे नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत होत्या. रस्त्यावरील खड्डे, धुळीचे साम्राज्य आणि वारंवार होणारे अपघात असूनही अधिकारी व ठेकेदारांना अनेकदा सांगूनही कोणतीही ठोस दखल घेतली जात नव्हती. अखेर या गंभीर समस्येबाबत दैनिकामध्ये बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर हा प्रकार आदरणीय डॉ. अण्णासाहेब हजारे यांच्या निदर्शनास आणून देण्यात आला. त्यानंतर प्रशासनाने हालचाल करत आज रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात केली आहे.


जातेगाव–राळेगण सिद्धी रस्ता बनला जिवघेणा!

### श्रीराम विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**ढोरजळगाव :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या मार्फत दिनांक २२ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.८ वी) चा अंतरिम निकाल नुकताच घोषित करण्यात आला. या परीक्षेत श्रीराम विद्यालय, ढोरजळगाव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाचे प्राचार्य संजय चेमटे तसेच पर्यवेक्षिका श्रीमती सुरेखा शेलार यांनी अभिनंदन केले आहे.

## कुरणमळ्यात झोपलेल्या महिलेचे दागिने हिसकावले

### सुपा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सुपा :** पारनेर तालुक्यातील रांजणगाव मशिद येथील कुरणमळा परिसरात मध्यरात्री घरासमोर झोपलेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी सुपा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जालिंदर आवाजी गाडवे (वय ५१, रा. कुरणमळा, रांजणगाव मशिद, ता. पारनेर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांची पत्नी रतनबाई जालिंदर गाडवे हे २५ मे रोजी रात्री साडेतीनच्या सुमारास घरासमोर झोपलेले असताना ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, रात्रीच्या सुमारास ३० ते ३५ वयोगटातील दोन अज्ञात चोरटे तेथे आले. त्यांनी रतनबाई गाडवे यांच्या गळ्यातील अंदाजे ४८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसकावून नेले. अचानक झालेल्या या प्रकारामुळे गाडवे दाम्पत्य जागे झाले. त्यांनी आरडाओरडा केला; मात्र चोरटे अंधाराचा फायदा घेत पसार झाले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. या प्रकरणी सुपा पोलिस ठाण्यात अज्ञात दोन चोरट्यांविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०४(२) व ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोहेकॉ. माळवदे करीत आहेत.

## बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना फक्त कागदोपत्रीच सुरू

### चाकशी करण्याची भीमशक्तीची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** गेली अनेक महिन्यापासून राज्य शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेला शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना हा फक्त कागदावरच असून तो प्रत्यक्ष कुठेच दिसून येत नसल्याने त्याची सखोल चौकशी करण्यात यावी अशी प्रमुख मागणी भीम शक्ती संघटनेचे शेवगाव शहराध्यक्ष कुणाल इंगळे व प्रदेश सरचिटणीस प्रा. चंद्रकांत कर्डक यांनी केली आहे. बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ही संकल्पना गेली अनेक महिन्यापासून राज्य शासनाच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आली असून सुरू करण्यात आलेल्या दवाखाना योजनेमार्फत तळागाळातील सर्वसामान्य गोरगरिबाना त्याचा लाभ मिळावा या उद्देशाने सदरची दवाखाना ही योजना सुरू केली मात्र ती योजना सुरू केल्यापासून अहिल्यानगर जिल्ह्यात फक्त कागदावरच असून सदर योजनेसाठी शासनाकडून लाखो रुपयांचा फंड निधी म्हणून दिला जात असताना व ही योजना प्रत्यक्ष सुरू नसतानाही शासनाकडून मिळालेल्या निधीचा मोठ्या प्रमाणात गैरवापर होत असल्याने त्याची शासन स्तरावर सखोल चौकशी होणे गरजेचे असल्याचे सांगून प्रा. कर्डक म्हणाले की, याच विषयासाठी मी संघटनेच्या वतीने या अगोदरही अनेक वेळा संबंधित विभागाशी पत्र व्यवहार केला असून आंदोलनही केलेले आहे परंतु त्याची शासन पातळीवरून कुठल्याही प्रकारची दखल घेण्यात आलेली नाही.

जिल्ह्यातील शेवगाव, नेवासा, पारनेर, पाथर्डी तालुक्यासह इतरही तालुक्यात ही योजना फक्त कागदावरच दिसून येत असल्याने आता याच प्रमुख विषयासाठी पुन्हा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा संघटनेचा विषय असून ते कोणत्याही क्षणी छेडले जाईल अशीही माहिती शेवटी इंगळे व प्रा.कर्डक यांनी दिली आहे.

## एकल महिलांसाठी शासन स्तरावर स्वतंत्र समिती : सोनवणे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** राज्य शासनाने राज्यातील एकल महिलांची संख्या लक्षात घेता स्वतंत्र त्यांना त्यांचे हित व अधिकारी प्राप्त व्हावेत आणि त्यातूनच त्यांची प्रगती व्हावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन शासन स्तरावर महिला व बालविभागामार्फत एक स्वतंत्र अशी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेऊन प्रत्यक्ष त्याची अंमलबजावणीही सुरू केली असून या समितीमध्ये राज्यातील अशा वेगवेगळ्या उपेक्षित महिलाना सातत्याने आधार देऊन त्याची मान उंचावणारे हेरंब कुलकर्णी यांना त्या समितीमध्ये घेऊन स्थान दिले असल्याबाबतची माहिती स्त्री – शक्ती फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रथमेश सोनवणे यांनी दिली आहे . या बाबत माहिती देताना ते म्हणाले की, आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारताचे संविधान निर्माण करताना डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक घटकाचा सखोल अभ्यास करून घटनेच्या माध्यमातून जे हक्क आणि अधिकार देण्याचा मोठ्या गांभीर्याने विचार करून प्रयत्न केलेला आहे तो निश्चितच सर्वांच्याच हितासाठी प्रेरणादाई असा ठरला असून त्याचाच एक भाग म्हणून राज्यात एकल महिलांची संख्या लक्षात घेता त्यांना त्यांचे हक्क व अधिकार कसे मिळतील व त्यांना इतरही महिलाप्रमाणे आपले महत्वाचे स्थान प्राप्त व्हावेत या संकल्पनेतून महत्त्वपूर्ण उद्देशाने राज्य शासनाने आपले स्तरावर जी एकल महिलांसाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याचा निर्णय घेऊन प्रत्यक्ष त्याची अंमलबजावणीही सुरू केली आहे. त्याबद्दल राज्य शासनाचे आभार मानले असून या समिती मध्ये शासन स्तरावरून वेगवेगळ्या विभागातील सदस्य घेऊन हेरंब कुलकर्णी या राज्यस्तरावर महिलांसाठी सातत्याने रात्रंदिवस काम करणाऱ्या व्यक्तीची निवड केल्याबद्दल आणि त्यांच्या या निवडीमुळे येथून पुढच्या काळात एकल महिलाना जो न्याय आहे.

## भाळवणीत महिलांचे एकत्रीत ‘धोंडे’ जेवण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भाळवणी :** पारनेर तालुक्यातील श्रीक्षेत्र नागेश्वर मंदिराच्या गाभाऱ्यात सुमारे दोनशे आंब्याचा अभिषेक घालून अधिक मासानिमित्त सामुहिक धोंडे जेवनाचा कार्यक्रम नुकताच पार पाडला. यावेळी मंदिराच्या पुजारी अश्विनी पवार यांनी गाभाऱ्यातील आंब्यांची आकर्षक सजावट केली होती.

उपस्थित सर्व महिलांनी सामुहिक वर्गणी करुन नागेश्वर मंदिर ट्रस्टच्या सहकार्याने धोंड्याबरोबरच आमरस, चपाती, वरण, भात, बटाट्याची भाजी, पापड असा मराठमोळ्या जेवणाचा बेत केला होता. यावेळी सुमारे सहाशे नागरिकांनी या धोंडेजेवनाचा आस्वाद घेतला. यावेळी स्वयंपाकासाठी गावातील तसेच वाडीवस्तीवरील शेकडो महिला सहभागी झाल्या होत्या.



**भाळवणी येथील नागेश्वर मंदिरात धोंडेजेवनाचा स्वयंपाक करताना महिला व जेवन करताना ग्रामस्थ. छाया : अभिजीत कपाळे, भाळवणी.**

## शेतकऱ्यांच्या रस्त्यासाठी ऐतिहासिक पाऊल!

### म्हातारपिंप्री मढेवडगाव नकाशावरील रस्त्याचे सीमांकन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील म्हातारपिंपरी – मढेवडगाव येथील नकाशावरील रस्त्याचे यशस्वी सीमांकन प्रशासन व शेतकरी यांच्या समन्वयातून पार पडले.उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर तहसीलदार सचिन डोंगरे , भूमी उपअधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या आदेशाने तसेच कर्तव्यदक्ष पीएसआय किरण शिंदे यांच्या उपस्थितीत ही कारवाई शांततेत आणि यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली.

शिव पाणंद शेत रस्ते चळवळीचे दादासाहेब जंगले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी रस्त्याचे अचूक सीमांकन केले. त्यानंतर तलाठी वाबळे मॅडम व कोतवाल योगेश ठोकळे, कॉन्स्टेबल काटकर व त्यांचे सहकारी यांच्या माध्यमातून अतिक्रमण कारवाईला सुरुवात करण्यात आली.

**या रस्त्यामुळे शेतकऱ्यांना होणारे महत्त्वाचे फायदे.** शेतात जाण्यासाठी कायमस्वरूपी कायदेशीर रस्ता उपलब्ध होणार पावसाळ्यात चिखल, अडथळे आणि वाहतुकीच्या समस्या कमी होणार ट्रॅक्टर, हार्वेस्टर, औषध फवारणी व शेतीमाल वाहतुकीस मोठी सुविधा मिळणार. द्राक्ष, ऊस, भाजीपाला व इतर पिकांचा माल वेळेत बाजारात पोहोचणार शेतकऱ्यांचे वेळ, श्रम आणि आर्थिक नुकसान वाचणार गावातील भविष्यातील पिढ्यांसाठी कायमस्वरूपी शेतरस्त्यांची व्यवस्था निर्माण होणार प्रशासन व शेतकरी एकत्र आल्यास कोणतीही समस्या मार्गी लागू शकते याचा आदर्श निर्माण झाला. यावेळी पीएसआय किरण शिंदे साहेब यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत सांगितले की, हे रस्ते शेतकऱ्यांच्या हितासाठी आहेत. प्रशासन आणि चळवळ समन्वय साधून ऐतिहासिक काम करत आहेत. या कामाला आमचे पूर्ण सहकार्य राहील. कोणीही अडथळा निर्माण करू नये.



## शेवगाव तालुक्यातील शेतकरी अद्याप कपाशी पीक विम्यापासुन वंचित

### आठ महिने उलटुनही पीक विमा देण्यात आला नाही

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**


**ढोरजळगांव :** शेवगांव तालुक्यातील व ढोरजळगांव परीसरातील मागील वर्षी आँगस्ट व सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.शेतक–यांनी उत्पादन खर्चावर व कापणी प्रयोगावर आधारित कपाशी पिकांच्या पीक विमा भरला परंतु विमा कंपनीकडुन वर्ष संपत आले तरीही पीक विमा रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप जमा करण्यात आलेली नाही.

मागील वर्षी परतीच्या पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते शासन यापूर्वी एक रूपयांत प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ शेतकऱ्यांना देत होते परिणामी शेतकऱ्यांना मोठी अर्थिक झळ सोसावी लागत नसे परंतु यावर्षी शासनाच्या वतीने कापणी प्रयोगावर आधारित पीक विमा योजना आणली खरी परंतु ती पुर्णपणे फोल ठरली असून मागील वर्षी प्रत्येक्षात नुकसान होऊनही विमा कंपनीच्या आडमुठ्या धोरणामुळे कपाशी तुर या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनही विमा कंपनीच्या दुटप्पी धोरणामुळे व शासनाच्या उदासीनतेमुळे शेतकरी विम्या पासुन अजुनही वंचित आहेत.

सद्यस्थितीत मागील वर्षी आँगस्ट सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सर्वात जास्त नुकसान हे कपाशी व तुर या पिकांचे झाले असताना प्रत्यक्षात विमा कंपनीने बाजरी, सोयाबीन उडीद भुईमूग या पिकांला विमा मंजूर करण्यात आला असुन शेवगांव तालुका पांढ–या सोन्याचं कोठार म्हणून ओळखले जाते परीसरात शेतकरी जिरायती व बागायती कापुसाचे तसेच तुरीचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते मात्र प्रत्यक्षात तालुक्यांमध्ये कपाशी तुरी सारख्या पिकांचा पीक विमा मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी उतरविला असला तरी विमा कंपनीने या दोन पिका व्यतिरिक्त अन्य पीकाचा विमा मंजूर करण्यात आला आहे विमा कंपनीचे धोरणे हे शेतकरी हितावह नसुन मारक ठरत आहे.

शेतकरी पीक विमा का भरतो तर नैसर्गिक आपत्ती अतिवृष्टी गारपीट आशा अनेक संकटामुळे शेती व्यवसाय जिकरीचा बनला असुन त्यामुळे एकीकडे शासन शेतकऱ्यांना पीक विमा भरण्याचा अट्टाहास करत असताना विमा कंपनीच्या वतीने शेतक–यांना पीक विम्यासाठी भरलेली रक्कम सुध्दा मिळण्याची श्वाश्वती राहिलेली नाही.

> मागील वर्षी परतीच्या पावसाने कपाशी बरोबर तुर व इतर पीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते त्यामध्ये शेवगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना सोयाबीन, भुईमूग,उडीद,बाजरी व एकमेव शेवगाव मंडळाला तुरीचा पीक विमा मंजूर झाला असून कपाशी पिकांच्या पीकविम्या प्रश्ना संदर्भातील विषय राज्यस्तरावर प्रलंबित असल्याचे अंकुश जोगदंड यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.
>
> **अंकुश जोगदंड (तालुका कृषि अधिकारी शेवगाव**




> शेवगाव तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये परतीच्या पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते नुकसानीची पालकमंत्री व संबंधित विभागाच्या आधिका–यांच्या वतीने पाहणी करून व नुकसान होऊनही कपाशी पिकांच्या पीक विमा शेतकऱ्यांना मिळाला नसुन तो देण्यात यावा अन्यथा शेतकरी आंदोलनाचा पवित्रा अवलंबल्या शिवाय राहणार नाही.
>
> **सुरेश पाटेकर (शेतकरी)**

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

गुरुवार दि.२८ मे २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८


## इंस्टाग्रामवर भाईगिरी; आरोपींना अटक, धारदार हत्यार व पिस्तूलासह 'रील' व्हायरल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : इंस्टाग्रामवर धारदार हत्यारे दाखवत भाईगिरी करणाऱ्या युवकांविरोधात राहुरी पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणी राहुरी पोलीस स्टेशन येथे शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल रवी गोविंद पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रशांत उर्फ चाच्या रावसाहेब पलघडमल (रा. सात्रळ, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) व एका अनोळखी इसमाविरोधात एफआयआर क्रमांक ५४८ नुसार शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी इंस्टाग्रामवर एक 'रीळ' तयार करून त्यामध्ये धारदार कत्ती व पिस्तूलासारखे शस्त्र दाखवत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. या व्हिडिओमध्ये प्रशांत पलघडमल हा हातात लाकडी मूठ असलेले लोखंडी हत्यार घेऊन दिसत होता, तर त्याच्यासोबत असलेल्या अनोळखी व्यक्तीच्या हातात पिस्तूलासारखे शस्त्र असल्याचे दिसून आले. दि. १९ मे रोजी पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे यांना गोपनीय बातमीदारामार्फत संबंधित व्हिडिओ प्राप्त झाला. त्यांनी व्हिडिओची पडताळणी केली असता तो इंस्टाग्रामवरील 'सुरज सपकाळे' या आयडीवरून प्रसारित झाल्याचे समोर आले. सदर व्हिडिओ सात्रळ गाव परिसरात चित्रित करण्यात आल्याचेही तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपींना ताब्यात घेतले. पोलिसांकडून त्यांना समज देण्यात आली असून आरोपींनी आपली चूक मान्य करत माफी मागितल्याची माहिती सूत्रांनी दिली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल सुरज अशोक गायकवाड हे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत. दरम्यान, सोमनाथ वाघचौरे यांनी नागरिकांना सोशल मीडियावर अशा प्रकारचे बेकायदेशीर व दहशत निर्माण करणारे व्हिडिओ प्रसारित न करण्याचे आवाहन केले आहे. अशा प्रकारचे कृत्य आढळल्यास संबंधितांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

## कुत्रे चावल्याच्या बहाणा ; ध्वजारोहण टाळले मुख्याधिकारी घोलप यांना बडतर्फ करा

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : कुत्रे चावल्याच्या बहाणा करून ध्वजा रोहन टाळणाऱ्या श्रीरामपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांची सर्वंकष चौकशी करून त्यांना सेवेतून तातडीने बडतर्फ करावे, अन्यथा न्यायालयात जाऊ असा इशारा येथील सामाजिक कार्यकर्ते अमित मुथा यांनी दिला आहे. ध्वजारोहण न करणाऱ्या मुख्याधिकारी घोलप यांच्या अनुपस्थिती संदर्भात मुथा यांनी माहिती अधिकारात माहिती मागितली त्यावेळेस हा गोलमाल उघडकीस आला आहे. मुख्याधिकारी घोलप यांनी २६ जानेवारी २०२६ रोजी ध्वजारोहण केले नसल्याची तक्रार मुथा यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती. १५ जानेवारी २०२६ ते ४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान घोलप यांनी कुत्रा चावला असल्याने वैद्यकीय उपचारासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे वैद्यकीय रजा मागितली. १६ जानेवारी २०२६ रोजी ही रजा मंजूर केली. १४ जानेवारी २०२६ रोजी श्रीरामपूर उपजिल्हा रुग्णालयाकडून मुख्याधिकारी घोलप यांचा मिळालेल्या अहवालात कोणतीही गंभीर दुखापत तसेच दवाखान्यात डमिट असल्याचा कोणताही दाखला नाही. ४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत रजेवर असलेल्या घोलप यांनी २६ जानेवारी रोजी ध्वजारोहण केले नाही. मात्र २७ जानेवारीला ते कार्यालयात कामावर हजर झाले. शासकीय कर्मचाऱ्यास जेथे असेल तेथे ध्वजारोहण करण्याचे कायद्याने बंधनकारक आहे. घोलप यांनी कायद्याचे उल्लंघन करत राष्ट्रीय सणाचा अपमान केला असल्याचे मुथा म्हणाले.

## पिकअपच्या धडकेत तरूणाचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील पानेगाव-शिरेगाव रस्त्यावर दुचाकी आणि मालवाहतूक पिकअप यांच्यात समोरासमोर धडक होऊन एका युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी दुपारी अडीचच्या सुमारास घडली.ज्ञानदेव अण्णासाहेब जाधव (वय ४४, रा. शिरेगाव, ता.नेवासा) असे मयत झालेल्या तरूणाचे नाव आहेत. मंगळवारी दुपारी मालवाहतूक करणारी पिकअप शिरेगाववरून पानेगावकडे जात होती, तर मयत ज्ञानदेव जाधव हे पानेगाव येथील बँकेतील काम आटोपून आपल्या दुचाकीवरून शिरेगावला आपल्या घरी चालले होते.अडीचच्या सुमारास श्रीराम मंदिराजवळ आल्यानंतर या दोन्ही वाहनांचा समोरासमोर अपघात झाला.या अपघातात ज्ञानदेव जाधव यांना जबर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.या अपघाताप्रकरणी सोनई पोलीस स्टेशनला खबर देण्यात आली.रात्री उशिरापर्यंत कोणताही गुन्हा दाखल नव्हता.अशी माहिती मिळाली. शवविच्छेदनासाठी मृतदेह नेवासा फाटा येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला होता.शवविच्छेदन झाल्यानंतर रात्री साडेआठ वाजता शोकाकुल वातावरणात पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.मयताच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगा, भाऊ असा परिवार आहे.

# श्रीरामपूरच्या कचरा डेपोतून धुराचे लोट

## बायोमायनिंग प्रकल्पाची सखोल चौकशी करण्याची देवकर यांची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : नगरपरिषदेच्या बायोमायनिंग प्रकल्पास आग लागली की लावली? असा आरोप शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख राजेंद्र देवकर यांनी उपस्थित केला. देवकर यांनी प्रसिद्धी दिलेल्या निवेदनात सागितले की, सध्या कचरा डेपोला १५ दिवसापासून मोठ्या प्रमाणात आगीचे लोट निघत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उपस्थित झाला.

श्वसनाचा आजार, खोकला, अन्य आजारामुळे स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहेत. याकडे गाभिर्यांने लक्ष देण्याचे गरजेचे असताना भ्रष्टाचार करण्यात व्यस्त झाले. त्यावेळी वाहन विभागाचे प्रमुख तापकिरे यांनी पाहणी तर, सोडा यात साधी चौकशी देखील केली नाही. गंभीरतेमुळे बायोमायनिंग प्रकल्प चौकशीच्या फेऱ्यात सध्या अडकला आहे. श्रीरामपूरमध्ये लागलेल्या कचरा डेपोला भीषण आगीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा विषय ऐरणीवर आला आहे.मात्र गभिर्यांने कोणी घेतले जात नाहीत.त्यामुळे त्याच्यावर कडक कारवाई झाली पाहिजेत.

तसेच, नगरपरिषदेत प्रशासकीय




काळात झालेल्या भ्रष्टचार झाकण्यासाठी श्रीरामपूरच्या कचरा डेपोला लागलेल्या आगीकडे जाणूनबजून नगरपालिका प्रशासनचे दुर्लक्ष करत असून नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याचा असा गंभीर आरोप शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख राजेंद्र देवकर यांनी केला.

केंद्र व राज्य सरकारच्या नगरपालिकेच्या बायोमायनिंग तीन कोटी सत्तर लाख रूपयांचा खर्च करून प्रकल्पास मंजूरी मिळाली.

यात नगरपालिकेचा मोठा सहभाग होता.या बायोमायनिंक प्रकल्पाचा ठेका एका कंपनीला मिळाला. प्रकल्पाचे तीन टप्यात - ब्लॉक इ ब्लॉक उ ब्लॉक असे वर्गीकरण करण्यात आले. त्यापैकी - ब्लॉक मधील कचरा उचलण्यात आला. धक्कादायक बाब म्हणजे बी आणि सी ब्लॉक मधील कचरा तसा पडून होता.

*श्रीरामपूर नगरपरिषदेच्या बायोमायनिंग प्रकल्पात तत्कालीन मुख्यधिकारी सोमनाथ जाधव तत्कालीन लेखापाल महेश कवटे, आणि आरोग्य अधिकारी दीपक खोब्रागडे यांनी ठेकेदाराशी संगनमत करून बोगस बिले लाटली. या भ्रष्टाचाराचे पुरावे नष्ट करण्यासाठी कचरा डेपोला आग लावली गेली. जिल्हाधिकाऱ्यानी तात्काळ ही आग आटोक्यात आणून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत.तसेच कर्तव्य चुकार वाहन प्रमुखांवर कारवाई करावी.*

**राजेंद्र देवकर, माजी जिल्हाप्रमुख शिवसेना**

यांचे पूर्ण बिले आदा करण्यात आली. यावेळी,तत्कालीन मुख्याधिकारी सोमनाथ जाधव तसेच तत्कालीन लेखापाल महेश कवटे व आरोग्य अधिकारी दिपक खोब्रागडे यांनी एका कंपनीच्या मालकास हाताशी धरुन कचरा त्याठिकाणी असतानाच देखील सर्व बिले आदा करून काढले. जादा कचरा उचलला म्हणून, नगरपरिषद फंडातून देखील अंदाजे २८ लाखांची बिले ठेकेदारस आदा करण्यात आली.याच, संदर्भात अनेक जणांनी संबधीत अधिकारी व ठेकेदार यांच्याविरोधात भ्रष्टाचाराच्या तक्रारी केल्या.त्यावेळी प्रशासक असलेले श्रीरामपूरचे प्रांतधिकाऱ्यांनी चौकशीचे करण्याचे आश्वासन दिले होते.

त्यावर काहीही उपयोग झालेला नाहीत.या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नियोजित समिती नेमण्यात आली.याबाबत विशेष म्हणजे कागदावरच राहिल्याने अनेकानी तक्रारी करून देखील सबंधित अधिकारी यांच्यावर अद्यापपर्यत कुठलीही कार्यवाही झालेली नाही.त्यामुळे प्रशासनाबाबत शंका उपस्थित केली जात आहे.

या सध्या कचरा डेपोला नुकतीच मोठ्या प्रमाणात आग लागलेली असल्याने परिसरामध्ये काळोखासारखे व दुर्गंधी पसरली.त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी व जीवाशी खेळण्याचे मोठे पाप अधिकारी करीत आहेत.त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी देवकर यांनी केली.

## सुगंधी मावा व गुटखा विक्री करणाऱ्या मावा माफियांवर कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : शहरात अवैधरीत्या मावा व सुगंधी तंबाखू तयार करून विक्री करणाऱ्या मावा माफियांवर पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करत तब्बल ३ लाख ४९ हजार ५०८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे राहुरी शहरातील अवैध तंबाखू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार एमआयडीसी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी विशेष पथकासह राहुरी शहरातील विविध ठिकाणी छापेमारी केली. या कारवाईत अवैधरित्या मावा तयार करणाऱ्या चार जणांना ताब्यात घेण्यात आले. पहिली कारवाई संजिवनी वसाहत, राहुरी खुर्द येथे करण्यात



आली. येथे गणेश मारुती दिवटे हा इसम घरामध्ये अवैधरीत्या मावा तयार करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

पोलिसांनी पंचांसमक्ष छापा टाकत सुपारी, सुगंधी तंबाखू व मावा तयार करण्याची मशीन असा ८४ हजार ८८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दुसरी कारवाई मल्हारवाडी रोडवरील इंगळे इस्टेट परिसरात करण्यात आली. येथे संदीप सुरेश तागड हा इसम अवैध मावा व्यवसाय करत असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी छापा टाकून १ लाख ११ हजार १२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तिसऱ्या कारवाईत स्टेशन रोड गावठाण परिसरात संदिप उर्फ पप्पू नामदेव शिरसाठ आणि अनिकेत भिमराज ठोंबे हे दोघे अवैध मावा निर्मिती करताना आढळून आले. त्यांच्या ताब्यातून सुपारी, सुगंधी तंबाखू आणि मशीनसह १ लाख ५४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या तिन्ही कारवायांमध्ये पोलिसांनी एकूण ३ लाख ४९ हजार ५०८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करत अवैध तंबाखू व्यवसायाला मोठा हादरा दिला आहे.

या प्रकरणी राहुरी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी, सहाय्यक फौजदार राकेश खेडकर, हवालदार नरोटे, आजीनाथ पालवे, शैलेश रोहोकले, विशाल थोरात, ज्ञानेश्वर आघाव, दीपक फुंदे, हरदास आणि नवनाथ दहिफळे यांच्या पथकाने केली.

## कमला एकादशीनिमित्त दत्त मंदिरात आंब्याची आरास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : तालुक्यातील सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्र श्री गुरुदेव दत्त पीठ, श्रीक्षेत्र देवगड संस्थान येथे सध्या श्रीमद भागवत कथा, कीर्तन महोत्सव आणि विष्णू याग सोहळ्यामुळे भक्तीचा पूर आला आहे. या उत्सवाचे औचित्य साधत बुधवारी 'कमला एकादशी'च्या पवित्र मुहूर्तावर भगवान दत्तात्रय,श्री समर्थ सद्गुरु किसनगिरी बाबा आणि पंचमुखी सिद्धेश्वर मंदिराच्या गाभाऱ्यात रसाळ 'केसर' आंब्यांची नयनरम्य आरास करण्यात आली. आंब्याच्या या आकर्षक सजावटीने मंदिराचा संपूर्ण गाभारा उजळून निघाला असून हा अलौकिक सोहळा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे.सध्या आंब्याचा अधिकृत हंगाम असल्याने फळांचा राजा असलेल्या 'केसर' जातीच्या शेकडो आंब्यांचा वापर करून ही आकर्षक सजावट करण्यात आली.

परमपूज्य गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि परमपूज्य स्वामी प्रकाशनगिरी महाराज यांच्या विशेष पुढाकाराने व कल्पकतेतून हे सजावटीचे कार्य अत्यंत देखणेपणाने पूर्ण करण्यात आले. भक्ती आणि निसर्गाचा अपूर्व संगम भागवत कथेच्या सुश्राव्य सुरांमध्ये आणि मंत्रोच्चारांच्या जयघोषात झालेली ही आंब्याची आरास म्हणजे भक्ती आणि निसर्गाचा एक अपूर्व संगम ठरली आहे. पिवळेशार, सुवासिक केसर आंबे आणि पाना-फुलांच्या सजावटीमुळे मंदिराच्या गाभाऱ्याला एक वेगळेच चैतन्य प्राप्त झाले होते.

दर्शनासाठी येणारे भाविक मंदिराचे हे विलोभनीय रूप पाहून मंत्रमुग्ध होत आहेत.निसर्गाची सुंदर निर्मिती देवाच्या चरणी अर्पण करण्याची ही परंपरा मनाला भक्तीचा आनंद देऊन जाते. देवगड पीठावर सुरू असलेला हा महोत्सव सर्व भाविकांसाठी एक पर्वणीच ठरत आहे

## उत्पादन शुल्क विभागाचे राहुरी तालुक्यात अवैध धंद्यावर ठिकठिकाणी छापे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राज्य उत्पादन शुल्क विभाग, श्रीरामपूर यांच्या पथकाने दि. २६ मे रोजी रात्री राहुरी तालुक्यातील राहुरी फॅक्टरी परिसरात अवैध दारू विक्री व हातभट्टी व्यवसायावर छापेमारी केली. पथक आल्याची चाहूल लागताच अनेक अवैध धंदे करणारे आपल्या घरांना कुलूप लावून पसार झाल्याची माहिती समोर आली. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने परिसरात छापेमारी करत असताना काही ठिकाणी देशी दारूच्या बाटल्या तसेच हातभट्टीचे साहित्य आढळून आले. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात हातभट्टी जप्त करून जागेवरच नष्ट करण्यात आले. या कारवाई दरम्यान संगीता जगताप यांच्या राहत्या घरा जवळ हातभट्टी व देशी दारूचा साठा आढळून आला. संबंधित साहित्य जप्त करून उत्पादन शुल्क विभागाने नष्ट केले.

तसेच या प्रकरणात संगीता जगताप व संगीता पवार या दोघी घटनास्थळावरून फरार झाल्याचे समजते. पथकाला या कारवाईत देशी दारूच्या बाटल्या व हातभट्टी दारुचे साहित्य मिळून आले. परिसरातील अवैध दारू व्यवसायावर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारल्याने अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून पुढील तपास सुरू आहे.

तसेच स्थानिक महिला रजाबाई कांबळे, कविता साळवे, लैला शेख, सुवर्णा मोकळ, स्वार्थाबाई जाधव, आलका पठारे, माया साठे, लता जगताप, शरद साळवे, रमेश जाधव, तुषार मोकळ, हर्ष कांबळे आदी प्रसाद नगर मधील महिला व नागरिकांनी पथकास सहकार्य केले. सदरची कारवाई अहिल्यानगर अधीक्षक प्रमोद सोनोने व ऋषिकेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत निरीक्षक एस एस हांडे व दुय्यम निरीक्षक एस सी मांडवेकर, जवान सर्वश्री, काळे, पालवे, ढेपले यांनी सहभाग घेतला. पुढील तपास दुय्यम निरीक्षक एस सी मांडवेकर हे करीत आहे.

## ममदापूरमध्ये शांतता समिती बैठक

### गोवंशीय जनावरांची कुर्बानी केल्यास कठोर कारवाईचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहाता** : बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर ममदापूर येथे शांतता समितीची बैठक उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी गोवंशीय जनावरांची कुर्बानी केल्यास संबंधितांविरोधात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिस प्रशासनाने दिला. बैठकीस लोणी पोलीस ठाणे चे सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे, ममदापूर येथील कुरेशी समाजाचे नागरिक, स्थानिक पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित नागरिकांच्या वतीने अमोल भारती व युवराज आठरे यांचा सत्कार करण्यात आला. बैठकीत बकरी ईद शांततेत आणि कायद्याचे पालन करून साजरी करण्याचे आवाहन करण्यात आले. गोवंशीय जनावरांची कत्तल अथवा कुर्बानी केल्यास प्रचलित कायदे व शासन नियमांनुसार कठोर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट करण्यात आले.

तसेच संबंधित ठिकाण निष्कासित करण्याबरोबरच आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाईचा इशाराही देण्यात आला. गोवंशीय जनावरांच्या कत्तलीतून जमा झालेली मालमत्ता शासनाकडून जप्त केली जाऊ शकते, असेही पोलिस प्रशासनाने बैठकीत नमूद केले. पोलिसांना माहिती देणाऱ्या नागरिकांना धमकावणे किंवा अरेरावी केल्यास संबंधितांविरोधातही कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन अमोल भारती यांनी दिले. परिसरात अशा प्रकारची कोणतीही घटना घडत असल्यास नागरिकांनी थेट संपर्क साधावा, यासाठी डीवायएसपी अमोल भारती यांनी आपला मोबाईल क्रमांक सार्वजनिक केला.

## साईसेवा पतसंस्थेचा 'मेगा घोटाळा' अखेर गुन्ह्यात

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : ठेवी सुरक्षित परतावा हमखास अशा गोड बोलांनी नागरिकांची आयुष्यभराची पुंजी गोळा करणाऱ्या साईसेवा पतसंस्थेचा अखेर पोलिसांच्या गुन्हे नोंदवहीत प्रवेश झाला आहे. तब्बल कोट्यवधी रुपयांच्या ठेवी अडकवून ठेवत ठेवीदारांना टाळाटाळ केल्याप्रकरणी श्रीगोंदा पोलिस ठाण्यात चेअरमन, संचालक आणि पदाधिकाऱ्यांसह २१ जणांविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीगोंदा तालुक्याची राजधानी काष्टी येथील साई सेवा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. आणि संबंधित क्रेडिट सोसायटीविरोधात न्यायालयाच्या आदेशानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे श्रीगोंदा पोलिस ठाण्यात दाखल ऋखठ क्रमांक ०५०५/२०२६ ने तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे.गुन्ह्यात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत फसवणूक, विश्वासघात, आर्थिक गैरव्यवहार यांसह माहिती तंत्रज्ञान अधिनियम आणि बेकायदेशीर ठेव योजना प्रतिबंधक कायद्यांतर्गतही कलमे लावण्यात आली आहेत. म्हणजे मामला फक्त पैसे अडकले इतकाच नाही, तर थेट आर्थिक जाळे विणल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे. तक्रारदार आणि इतर ठेवीदारांनी न्यायालयात धाव घेतल्यानंतर जिल्हा न्यायालयाने श्रीगोंदा पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानंतर अखेर २७ मे रोजी मध्यरात्री गुन्हा नोंदवण्यात आला.तक्रारीनुसार, पतसंस्थेने जादा व्याजाचे आमिष दाखवत नागरिकांकडून बचत ठेवी, फिक्स डिपॉझिट आणि विविध योजनांमधून लाखो रुपये जमा करून घेतले. मात्र मुदत संपल्यानंतर ठेवीदार पैसे मागण्यासाठी गेले असता उद्या या, फाईल झाली नाही, ऑडिट सुरू आहे अशा कारणांची मालिका सुरू झाली. गावोगावी ठेवीदारांचे हेलपाटे वाढले आणि अखेर प्रकरण न्यायालयापर्यंत पोहोचले.या प्रकरणात काही ठेवीदारांचे ४ लाख, १० लाख, १४ लाख तर काहींचे तब्बल ३१ लाख रुपयांपर्यंत व्यवहार अडकले असल्याचे तक्रारीत नमूद आहे. अनेक कुटुंबांची लग्नसराई, शेती, शिक्षण आणि वैद्यकीय खर्चासाठी साठवलेली रक्कम अडकून पडल्याने संतापाची लाट पसरली आहे. विशेष म्हणजे, २०२० पासून २५ मे २०२६ पर्यंतचा कालावधी या कथित आर्थिक गैरव्यवहारासाठी नमूद करण्यात आला आहे. म्हणजेच ठेवी जमा करा आणि वेळ आली की गायब व्हा असा प्रकार अनेक वर्षे सुरू असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.दरम्यान, या कारवाईमुळे तालुक्यातील इतर पतसंस्था आणि आर्थिक संस्थांमध्येही धडकी भरली असून आता पुढचा नंबर कुणाचा? अशी चर्चा चहाटळ्यांपासून बाजारपेठेपर्यंत रंगू लागली आहे. पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. ठेवीदार मात्र एकच प्रश्न विचारत आहेत आमचे पैसे परत कधी?मात्र त्याचे उत्तर अजूनही गुलदस्त्यात आहे

## कोपरगावात महार वतनाच्या जमीनीवर बेकायदेशीर कब्जा!

### ग्रामस्थांचे बेमुदत उपोषण : राष्ट्रीय अनुसूचित जाती जमाती आयोगाने घेतली नोंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : कोपरगाव शहरात मागासवर्गीय समाजाच्या महार वतनाच्या जमीनीवर गैर मार्गाने बळकावून मागासवर्गीय समाजास वंचीत ठेवल्याचे निषधार्थ कोपरगाव येथील असंख्य नागरिकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ बेमुदत उपोषणास सुरुवात केली आहे.

कोपरगावातील सर्वे नंबर ५,६,७,८,९ हे गटनंबर ही जमीन कोपरे, दुशिंग ,गायकवाड या




वतनदारांची असून महसुल विभागा कडून सदर जमीन महार वतनाची असल्याचे स्पष्ट अभिप्राय प्राप्त झाला आहे.

परंतू सदर जमीनीवर धनदांडग्यांनी अतिक्रमण करून दलीत समाजाची सरकारी जमीन बळकावली असून दलीत समाजास वंचीत ठेवल्याने दलीत समाजावर मोठा अन्याय झाला असून सदर धनदांडग्यावर अनुसुचित जमाती क्ट नुसार गुन्हे दाखल करावे अशी मागणी यावेळी आंदोलकांनी केली असून या ठिकाणी न्याय न मिळाल्यास मुंबई मंत्रालया समोर तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान या प्रकरणाची राष्ट्रीय अनुसुचित जाती जमाती आयोगाने गंभीर दखल घेतली असून जिल्ह्यातील महसुल विभागाला विचारणा करण्यात आली आहे. या आंदोलनात प्रकाश दुशिंग, संतोष कोपरे, बाबासाहेब कोपरे, देविदास गायकवाड, पोपट कोपरे, प्रदिप दुशिंग, सुशील कोपरे, मारुती' कोपरे, सरोश कोपरे, अशोक कोपरे, श्रीकांत दुशिंग, किशोर दुशिंग, राजेंद्र कोपरे, प्रमोद कोपरे, आकाश, श्रीकांत दुशिंग, संदीप दुशिंग, आनंद कोपरे, भाऊसाहेब दुशिंग, मनोडा कापरे, दादा देविदास गायकवाड यांच्यासह शेकडो महीला व ग्रामस्थ सहभागी झाले आहेत.